सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ५६ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ गुरुवार दि. २० मार्च २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## राज्यातील सरकारी शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू, शिक्षणमंत्र्यांची सभागृहात घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच स्टेट बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढील लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात आज सभागृहात माहिती देत घोषणा केली. विशेष म्हणजे यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतरही त्यांनी राज्यात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यासंदर्भात आढावा सुरू असल्याचे म्हटले होते.

राज्य अभ्यासक्रम आराखड्याला




शालेय शिक्षण विभागाशी संदर्भात सुकाणू समितीने मान्यता दिली असून मंत्री दादा भुसे यांनी विधान परीषदेतील प्रश्नावर लेखी उत्तर देत माहिती दिली. भाजप नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले. राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली का? असा प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी विचारला होता. त्यावर, सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करुन दिली जाणार असून १ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याचे उत्तर दादा भुसे यांनी दिले. त्यामुळे, गेल्या २ महिन्यांपासून सुरू असलेल्या

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत केल्या होत्या सूचना**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला होता. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान, त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना केल्या होता.

## दिशा सालियानवर अत्याचार करुन हत्या आरोपांवर आदित्य ठाकरे म्हणाले, कोर्टात जे होईल...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणावरून महाराष्ट्रतलं राजकारण पुन्हा एकदा तापलं आहे. या प्रकरणात माजी मंत्री आणि ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्या कथित भूमिकेची चौकशी करण्यासाठी दिशा सालियनच्या वडिलांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. दिशावर सामूहिक बलात्कार



करून तिची हत्या करण्यात आल्याचा दावा याचिकेतून करण्यात आला आहे. त्यामुळे आदित्य ठाकरेंसह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आलीय. त्यामुळे सत्ताधाऱ्यांकडून आदित्य ठाकरेंवर निशाणा साधण्यात येत आहे. या सगळ्या प्रकरणावर आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्या मुलीच्या मृत्यूची एनआयए चौकशी करण्याची मागणी केली आहे. दिशा सालियनच्या वडिलांनी याचिकेत सूरज पांचोली, आदित्य ठाकरे आणि डिनो मोरिया यांच्यावर आरोप केले आहेत. तसेच दिशा सालियानच्या वडिलांनी दाखल केलेल्या याचिकेत किशोरी पेडणेकर आणि पोलिसांनी आमच्यावर दबाव आणल्याचे म्हटलं. राज्यपालांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना आदित्य ठाकरे यांनी या आरोपांवर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

पाच वर्षे सातत्याने बदनामीचा प्रयत्न होत आहे हे प्रकरण कोर्टात आहे त्यामुळे कोर्टातच बोलू. माझ्यावरून सभागृह बंद पाडले जात आहे. पाच वर्षापासून हेच चालू आहे. पण कोर्टात जे होईल ते होईल. पाच वर्षापासून मी यावर मुद्द्याचं बोलत आलेलो आहे आणि बोलत राहणार, अशी प्रतिक्रिया आदित्य ठाकरेंनी दिली.

## आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

जगातील सर्वात उंच पुतळा असा लौकिक असणारा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'सह शेकडो पुतळे घडवणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत घोषणा केली आहे. राम सुतार हे १०० वर्षांचे आहेत. सरदार वल्लभभाई पटेल यांचा सरदार सरोवर येथे साकारण्यात आलेला ८५ फूट बेस व ५२२ फूट उंचीचा सर्वांत मोठा पुतळा सुतार यांनी तयार केला आहे.




महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीनिमित्त भारत सरकारने रशिया, मलेशिया, इंग्लंड अशा विविध देशांना महात्मा गांधीजींचा पुतळा भेट दिला. गांधीजींचे भारतासह जगभरात बसविलेले जवळपास ३५० पुतळे राम सुतार यांनी साकारले आहेत. अरबी समुद्रात साकारण्यात येणाऱ्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे कामही त्यांच्याकडेच आहे.

राम सुतार यांनी १९४७ साली बॉडी बिल्डरचा पहिला पुतळा बनवला. आपल्याच शाळेसाठी १९४८ साली महात्मा गांधीजींचा पुतळा बनवला. तेथून त्यांचा शिल्पकलेचा प्रवास सुरू झाला. जोशी सरांनी त्यांना मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समध्ये शिक्षण घेण्याविषयी सुचविले, शिवाय त्यांची राहण्याची व उदरनिर्वाहाची सोयही करून दिली. त्यांनी सुवर्णपदकही मिळविले.

**संसद परिसरात १६ पुतळे**

राम सुतार यांनी चंबळच्या देवीची मूर्ती साकारली होती. ही मूर्ती पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना इतकी आवडली की, त्यांना भाक्रा नानगल धरणावर ब्राँझचा पुतळा बनवण्यास सांगितले; मात्र काही कारणामुळे हा प्रकल्प अपूर्ण राहिला. त्यानंतर सुतार यांनी संसदेच्या आवारात बसविण्यात आलेले शिवाजी महाराज, महात्मा गांधी, नेहरू, इंदिरा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, भगतसिंग, महात्मा फुले, अशा थोर विभूतींचे जवळपास १६ पुतळे बनवले.

**राम सुतार यांनी साकारलेली महत्त्वाची शिल्पे**

संसद भवनाच्या आवारातील मौलाना आझाद (१८ फूट), इंदिरा गांधी (१७ फूट), राजीव गांधी (१२ फूट), गोविंदवल्लभ पंत (१० फूट) आणि जगजीवनराम (९ फूट) असे अनेक पुतळे राम सुतार यांनी घडविले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस यांची शिल्पंही त्यांनी घडवली आहेत.

फ्रान्स, इटली, अर्जेंटिना, रशिया, इंग्लंड या देशांमध्येही राम सुतार यांनी साकारलेली शिल्पं पाहायला मिळतात. रवीन्द्रनाथ टागोर यांचा टोकियोतील पुतळा राम सुतार यांनी तयार केला आहे.

## 'तीन वर्षे आमचेच सरकार, तपासात काही सापडले नाही' एकनाथ शिंदेंचे आमदार आदित्य ठाकरेंच्या बाजूने बोलले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची माजी मॅनेजर दिशा सालियान मृत्यू प्रकरणाची आता पुन्हा एकदा चौकशी होणार आहे. दिशाचे वडिल सतीश सालियान यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मृत्यू प्रकरणाची पुन्हा एकदा सीबीआय मार्फत चौकशी करण्याची मागणी या याचिकेत केली आहे. दरम्यान, आता भाजपाचे नेते आक्रमक झाले आहेत. तर दुसरीकडे एकनाथ शिंदेंच्या एक आमदार आदित्य ठाकरेंच्या बाजूने बोलल्याचे दिसत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आमदार संजय गायकवाड यांनी या प्रकरणातील आरोपामध्ये काही तथ्य नसल्याचे म्हटले आहे. आज माध्यमांसोबत बोलताना शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड म्हणाले, दिशा सालियान प्रकरणात सीआयडीच्या तपासात राजकीय




नेत्यांचा सहभाग नव्हता. मी आदित्य ठाकरेंची पाठराखण करत नाही, जे तपासात समोर आलंय ते सांगतोय.कोणाकडे काही पुरावे असतील तर द्यायला हवे होते. कोणाकडे काही पुरावे नाहीत म्हणून आदित्य ठाकरे यांना क्लिन चीट दिली. त्यावेळी महाविकास आघाडीचे सरकार होते. पण मागची तीन वर्षे आमचेच सरकार सत्तेवर होते, असंही संजय गायकवाड म्हणाले.

दिशा सालियान मृत्यू प्रकरणाच्या याचिकेवरुन अमोल मिटकरी यांनी प्रतिक्रिया दिली. मिटकरी म्हणाले, दिशा सालियन प्रकरणात इतक्या वर्षानंतर याचिका का दाखल करण्यात आली ? इतकी दिरंगाई का केली? राज्यात औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्यावरुन वातावरण भरकटवले जात आहे. हे महाराष्ट्र समोरचे प्रश्न नाहीत. राजकीय लोकांनी याला हवा देऊ नये. विरोधक आणि सत्ताधारी यांनी दिशा सालियन प्रकरणात महाराष्ट्राचे मूळ प्रश्नांना बगल देऊ नये. प्रशांत कोरटकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी केली.

## आदित्य ठाकरेंनी ८ जानेवारीचं मोबाईल लोकेशन दाखवावं ; नितेश राणेंचं ओपन चॅलेंज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

बॉलिवूडचा दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची माजी मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यूप्रकरणात तिच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेमध्ये त्यांनी महाविकास आघाडी सरकारच्या काळातील मंत्र्यावर गंभीर आरोप केले आहेत. या मंत्र्याला तात्काळ अटक करुन त्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आज (गुरुवारी) सत्ताधारी आमदारांकडून विधानसभेत करण्यात आली. दिशा सालियनच्या वडिलांनी कोर्टात दाखल केलेल्या



याचिकेत आदित्य ठाकरे यांचा हत्याप्रकरणाशी संबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी सुरवातीपासून आक्रमक भूमिका घेणारे भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी देखील सरकारने याची दखल घ्यावी आणि दिशा सालियनच्या वडिलांनी घेतलेल्या नावांची चौकशी करावी असं म्हटलं आहे.

नितेश राणे खोटे बोलत आहेत हे त्यांनी सांगावं, ही ओपन आणि शट केस आहे. यात सुप्रीम कोर्टात स्पष्ट नाव घेण्यात आली आहेत, असं आव्हान देखील नितेश राणे यांनी आदित्य ठाकरे यांना दिलं आहे.

आधी आम्ही आरोप करत होतो, तर राजकीय हेतूने करत असल्याचं म्हटलं जात होतं. आता तिच्या वडिलांनी आरोप केले आहेत. उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री होते त्यांनी हे प्रकरणं दाबण्याचा प्रयत्न केला काय़ तिचा मृतदेह फॉरन्सिकला का नाही पाठवला? १४व्या माळ्यावरून ती पडली तर तिच्या अंगावर एक खरचटल्याचे व्रण नाही. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असताना आदित्य ठाकरेंनी उन्माद केला आहे, केलेली कर्म इथेच फेडायची असतात, असंही पुढे नितेश राणे यांनी म्हटलं आहे.

## आदित्य ठाकरेंना तात्काळ अटक करुन चौकशी करा - शंभुराज देसाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

दिशा सालियन मृत्यूप्रकरणात तिच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून त्यामध्ये महाविकास आघाडी सरकारच्या काळातील मंत्र्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या मंत्र्याला तात्काळ अटक करुन त्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी गुरुवारी सत्ताधारी आमदारांकडून विधानसभेत करण्यात आली. त्यामुळे आदित्य ठाकरे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. दिशा सालियनच्या वडिलांनी कोर्टात दाखल केलेल्या याचिकेत आदित्य ठाकरे यांचा हत्याप्रकरणाशी संबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या आरोपांनंतर भाजपच्या आमदारांनी



अपेक्षेप्रमाणे आज सभागृहात हा मुद्दा उपस्थित करत थेट आदित्य ठाकरे यांना अटक करण्याची मागणी केली.

यावेळी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिशा सालियन प्रकरणात एसआयटी चौकशी सुरु असल्याचे सांगितले. त्याचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. मात्र, आम्ही कोर्टाच्या निर्देशानुसार कारवाई करु, असे योगेश कदम यांनी म्हटले. त्यानंतर भाजप आमदार नितेश राणे यांनी उभे राहत म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाच्या एका आदेशानुसार अशाप्रकरणात ज्या संबंधित व्यक्तीवर आरोप होतो, त्याला तात्काळ अटक करुन त्याची चौकशी करावी लागते. काल सतीश सालियन यांनी मविआच्या काळातील मंत्र्यावर आरोप केले. त्यामुळे त्या नेत्याला सामान्य व्यक्तीप्रमाणे न्याय लावावा, अशी मागणी नितेश राणे यांनी केली. नितेश राणे यांच्या या मागणीला शिंदे गटाचे मंत्री शंभुराज देसाई यांनी समर्थन दिले. नितेश राणे म्हणता त्याप्रकारे सामान्य माणसाला जो न्याय लागतो, तोच नियम माजी मंत्र्याला लावला पाहिजे. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी आरोपीला तात्काळ अटक करून चौकशी करावी, असे शंभुराज देसाई यांनी म्हटले. त्यामुळे आता गृहखात्याकडून आदित्य ठाकरे यांच्यावर काही कठोर कारवाई होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## दिशा सालियन प्रकरणी...अनिल परबांचा सभागृहात हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी मंत्री जयकुमार गोरे आणि किरीट सोमय्यांचा दाखला देत जोरदार प्रत्युत्तर दिले. या प्रकरणांची चौकशी का होत नाही? अशी विचारणा त्यांनी केली.

**जयकुमार गोरेंचे उघडे, नागडे फोटो सभागृहात आले**

अनिल परब म्हणाले की, किरीट सोमय्याची बायको आत्महत्या करायला चालली होती, जयकुमार गोरेंचे उघडे, नागडे फोटो सभागृहात आले. मात्र, त्याची चौकशी केली जात नाही. विरोधी पक्ष कमजोर आहे म्हणून कसही दाबू नका, असे परब म्हणाले. त्यांनी सांगितले की, कायद्यानं आदित्य ठाकरे यांचं कायद्यानं जे काय व्हायचं ते होईल. आदित्य ठाकरेंची केस किती दिवस चालू आहे. सीबीआय चौकशी सुरु आहे, एसआयटी आहे, सीआयडी चौकशी सुरू आहे.सगळे विषय बाजूला जावे म्हणून हे सुरु आहे का? अशी



विचारणा त्यांनी केली. अनिल परब म्हणाले की, मनिषा कायंदे यांचे ट्विट वाचून दाखवतो. सत्य परेशान हो सकता है पराजित नहीं. मनिषा कायंदे सरड्यापेक्षा फास्ट रंग बदलला, सरड्याला पण लाज वाटली. जयकुमार गोरे यांच्याबद्दल कोणी बोलत नाही, घ्या ना त्याचा राजीनामा, असे आव्हान त्यांनी दिले. विरोधी पक्ष कमजोर आहे म्हणून काहीही वागायचं, किरीट सोमय्याचा व्हीडिओ दिला होता त्याची चौकशी का नाही केली? अशी विचारणा त्यांनी केली. कामकाजाबद्दल जे विरोधी पक्षनेते बोलले ते बरोबर आहे. सभापती हे सर्व पक्षांचे होतात, असे ते म्हणाले.

## संपादकीय ......

# दुर्लक्षित कोनशिला

आपल्या राज्यामध्ये गड-किल्ल्यांकडे दुर्लक्ष केले जाते, असा नेहमी आरोप केला जातो. गौरवशाली इतिहासाचे जतन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शासन आपल्या स्तरावर बर्याच गोष्टी करत असते. त्यापैकी याही महत्त्वाच्या बाबी असतात. आज आणखी एका दुर्लक्षित बाबीकडे आम्ही लक्ष वेधू इच्छित आहोत. एखादा नवीन प्रकल्प यायचा असेल, तर त्याची पब्लिसिटी फार मोठ्या प्रमाणावर केली जाते. उदाहरणार्थ, एखाद्या भागामध्ये शासकीय दवाखाना होणार असेल, तर होते काय ते आधी समजाऊन घेऊ. इथे दवाखाना होणार अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रांमध्ये यायला लागतात. त्यानंतर शासनाच्या वतीने बांधकाम करणारा विभाग सक्रिय होतो आणि भूमिपूजन करण्याचे ठरते. मोठा दवाखाना असेल, तर भूमिपूजनासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांना आमंत्रित केले जाते. जे लोक त्या वास्तूचे भूमिपूजन करणार आहेत, त्यांच्या नावाची एक कोनशिला म्हणजेच संगमरवरी दगडावर कोरलेली पाटी तयार केली जाते.

आजूबाजूच्या परिसरातील जनतेला विश्वास असतो की, किमान दोन ते तीन वर्षांमध्ये या ठिकाणी एक सुसज्ज असे रुग्णालय उभे राहील आणि आपल्या परिसरातील जनतेला आरोग्याची सुविधा उपलब्ध होईल. कार्यक्रम होतो, प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कुदळ मारून भूमिपूजनही केले जाते. तिथे बसवलेल्या कोनशिलेचे अनावरण ही केली जाते. कार्यक्रम संपतो, सर्वजण निघून जातात आणि त्या पडीक जागेत असलेली कोनशिला उद्धार होण्याची वाट पाहत राहते. कार्यक्रमासाठी आलेले प्रमुख पाहुणे रेकॉर्ड काळामध्ये हे काम पूर्ण होईल, असे आश्वासन देतात. यावेळी उपस्थित पत्रकार रेकॉर्ड काळामध्ये म्हणजे किती काळात? असा प्रश्न विचारतात तेव्हा जेमतेम दोन ते तीन वर्षांत हे काम पूर्ण करून हे रुग्णालय जनतेच्या सेवेत रुजू होईल, असे सांगितले जाते; पण प्रत्यक्षात तसे होत नाही. तुम्ही पाच वर्षांनंतर त्या जागी गेला, तर त्या भयाण जागेमध्ये आपले तेज हरवून बसलेली ती कोनशिला बिचारी उन्हातानात बसलेली असते. ना तिथे रुग्णालय होते ना त्या कोनशिलेचा उद्धार.

दुर्लक्षित स्मारके आणि सोबतच भूमिपूजन होऊन तयार झालेल्या कोनशिला कोणत्या जिल्ह्यात किती आहेत, याचा [illegible] पत्रकारां[illegible] घेतल[illegible] प्रकल्प जाहीर [illegible] किती अस्तित्वात येतात, [illegible] खुलासा होऊ शकेल. भूमिपूजनावर खर्च करण्यापेक्षा थेट बांधकाम सुरू केल्यास काही लाख रुपये त्या बांधकामाला वापरता येतील अशी शक्यता आहे. यंत्रणा अशाच काम करत असतात आणि याची त्यांना वर्षानुवर्षे सवय असते. काही सजग नागरिक माहितीच्या अधिकारात बरीच काही माहिती काढतात; पण भूमिपूजन होऊन प्रत्यक्ष प्रकल्प उभे राहणे यामध्ये जो काळ जातो त्यालाही काही निर्बंध नाहीत. हे असेच सुरू आहे आणि पुढील कित्येक वर्षे असेच सुरू राहणार असे वाटते. कोनशिला बसवताना हा प्रकल्प किती तारखेला पूर्ण होणार आहे, याची तारीख टाकली, तर अशा दुर्लक्षित कोनशिला कमी होतील, अशी सूचना करावीशी वाटते.

विदर्भ प्रजासत्ताक

# 'उष्माघात' टाळण्यासाठी सर्व कार्यालयामध्ये आता 'वॉटरबेल' वाजणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती–** देशातील बहुतांशी राज्यात तसेच महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना वातावरणातील बदलाचा विशेष करून उन्हाळ्यातील वाढत्या तापमानाचा आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या उष्माघातजन्य आणि अनुषंगिक आजारांचा सामना करावा लागत आहे. एप्रिल महिन्याच्या उर्वरित काही दिवस येणाऱ्या मे महिन्यात संभाव्य वाढत्या तापमानाचा आलेख आणि भार[illegible] विभाग[illegible] अनुषंगाने उष्माघा[illegible]साठी आता सर्व शाळा, सर्व शासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सर्व कार्यालय, अंगणवाडीमध्ये प्रत्येक एका तासाला वॉटर बेल वाजवली जाणार आहे. याबाबतच्या सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून देण्यात आलेल्या आहेत. शाळा, संस्था, कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, विविध कार्यालयांना आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी यांनी किमान एका तासाला किमान एक ग्लास पाणी पिण्याच्या सूचना देण्यात याव्यात अशा सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी [illegible] मार्फत देण्यात [illegible] सर्व शासकीय संस्था [illegible] इतर शासकीय संस्था स्थानिक स्वराज्य संस्था सर्व कार्यालय सर्व अंगणवाडी शाळा या ठिकाणी दर एका तासाला बेल वाजवून अथवा सार्वजनिक पुकारणा करून सर्वांना किमान एक ग्लास पाणी पिणे बाबत सूचना देण्यात याव्यात असे परिपत्रक स्पष्ट करण्यात आले आहे.



उष्णतेच्या लाटेमध्ये सर्वसामान्य जनतेने प्रामुख्याने शरीरातील पाण्याचे प्रमाण उत्तम ठेवणे महत्त्वाचे आहे.प्रत्येक प्रौढ व्यक्तीने वातावरणात सरासरी किमान (०-४) शून्य ते चार ते शून्य ते पाच लिटर इतके पाणी पिणे आवश्यक आहे. लहान मुले आजारी व्यक्ती यांनी देखील मुबलक प्रमाणात पाणी पिणे आवश्यक आहे. आरोग्य अधिकारी आरोग्य कर्मचारी शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थी नोकरी व्यवसाय व शेती करणारे नागरिक या सर्वांना बऱ्याचदा कामांमध्ये व्यस्त पणामुळे तहान लागली असली तरीदेखील पाणी पिण्याचा विसर पडताना आढळून येतो त्यामुळे काळजी घेणे गरजेचे आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास व बऱ्याच काळ उष्णतेच्या संपर्कात राहिल्यास उष्माघात या क्रमाने अधिकाधिक गंभीर परिस्थिती उद्भवू शकते. योग्य प्रतिबंधक व उपाय उपचारात्मक उपाय योजना तात्काळ न केल्यास प्रसंगी मृत्यू देखील उडवू शकतो. म्हणूनच सर्वांवरील सोपा उपाय म्हणजे एका तासाला किमान एक ग्लास एवढे शुद्ध पाणी पिणे व त्यात सातत्य राखणे महत्त्वाचे ठरणार आहे. जेणेकरून शरीरातील जल शुष्कतेची परिस्थिती उद्भवणार नाही. त्यासाठी आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी यांनी याबाबत सजग राहण्याची गरज आहे असे नमूद करण्यात आलेले आहे.

# लाच मागणाऱ्या नांदगाव खंडेश्वरच्या फौजदाराविरुद्ध गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०नांदगाव खंडेश्वर** – नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षकासह त्याच्या खासगी साथीदाराविरुद्ध पाच हजाराची लाच मागितल्याप्रकरणी अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली. पीएसआय दर्शन दिकोंडवार (वय ३८) व खासगी व्यक्ती सुकेश अनिल सारडा (२९, नांदगावखंडेश्वर) अशी त्यांची नावे असून त्यांच्याविरुद्ध नांदगाव खंडेश्वर पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.



पोलिस उपनिरीक्षक दर्शन दिकोंडवार यांनी तक्रारदाराच्या वडिलांच्या नावे असलेली ट्रॅक्टर ट्रॉली सोडण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच मागितली. ती रक्कम मुकेश याच्याजवळ देण्यास सांगितले, अशी तक्रार एसीबीकडे नोंदविली होती. १३ मार्चला एसीबीने पोलिस ठाण्यातच ट्रॅप लावला. दिकोंडवार यांना संशय आल्याने त्याने ती लाचेची रक्कम स्वीकारली नाही. मात्र आधी लाचेची रक्कम स्वीकारण्याची दर्शविल्याचे कारवाईदरम्यान तयारी सापळा निष्पन्न झाल्याने १८ मार्चला दिकोंडवार व सुकेश सारडा यांच्याविरुद्ध एसीबीकडून तक्रार दाखल करण्यात आली.सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती मारुती जगताप, अपर पो-लीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधिक्षक अभय आष्टेकर, पोलीस उपअधिक्षक मंगेश मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक चित्रा मेसरे, केतन माजरे, हवालदार प्रमोद रायपुरे, पोलीस अंमलदार शैलेश कडु, अंमलदार वैभव जायले, चालक फौजदार सतिश कीटूकले यांनी केली.

# पाण्याची सोय जेमतेम, मग उन्हाळी भाजीपाला पिकांचे असं करा व्यवस्थापन

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

पीक उत्पादनाच्या दृष्टीने भाजीपाला पिकांना उन्हाळी हंगामातपाण्याच्या गरजेनुसार पाणी नेमके किती द्यावे? हे समजून घेणे आवश्यक आहे. नेमक्या पाळ्यातून पाणी विभागून द्यावे तसेच ते केव्हा द्यावे? हे लक्षात घेणे गरजेचे असते. पिकाचा कालावधी, प्रकार, जमिनीचा प्रकार, हा गोष्टींवर पिकाची पाण्याची गरज अवलंबून असते.

**उन्हाळी भाजीपाला पिकांचे पाणी व्यवस्थापन–** कोबी, फ्लॉवर व पालेभाज्यापाण्याचा ताणसहन करू शकत नाही. त्यामुळे या भाज्यांना कमी अंतराने पाणी पुरवठा करावा लागतो. याउलट मिरची, वांगी, गवार, घेवडा, वाल इत्यादी भाज्या पाण्याचा ताण सहन करू शकतात.भाजीपाला पिकासाठी पाण्याच्या दोन पाळ्यातील अंतर ठरविताना पिकांच्या वाढीच्या अवस्था लक्षात होणे गरजेचे असते. उन्हाळी हंगामात बियांच्या उगवणीच्यावेळी फुले आणि फळधारणा होताना आणि फळे पोसण्याच्या काळात पाण्याचा तुटवडा पडू देऊ नये.

उन्हाळ्यात कोरडी हवा आणि अधिक तापमानामुळे बाष्पीभवन व पानांवाटे होणारे पर्णोत्सर्जन खूपच वाढते. त्यामुळे पिकांना जास्त प्रमाणात आणि कमी अंतराने पाणी दयावे लागते. पिकाला पाणी देताना जमिनीचा मगदूर, खोली, पोत, घडण, सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण या गोष्टींचा विचार करून पाण्याच्या दोन पाळ्यांतील अंतर कमी जास्त करावे लागते.


विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष






उथळ जमिनीत पाणी लवकर द्यावे लागते. तर माध्यम किंवा भारी जमिनीत दोन पाळ्यांतील अंतर जास्त ठेवावे लागते.

भेंडी पिकास आवश्यकतेनुसार पाच ते सहा दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे. फळे येण्याच्या सुमारास पाण्याचा ताण पडू देवू नये. उन्हाळी हंगामात वांग्याच्या पिकास सहा ते आठ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. मिरची पिकाला प्रमाणापेक्षा जास्त किंवा कमी पाणी दिल्याने फुलगळ होते. मिरची पिकाला उन्हाळी हंगामात सहा ते बारा पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. कांदा पोसायला लागल्यावर पाण्याचा ताण कमी पडू देऊ नये, कांदा पिकाला उन्हाळी हंगामात सात ते आठ दिवसाच्या अंतराने नियमित पाणी द्यावे.




**– डॉ. कल्याण देवळाणकर, सेवानिवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ**

# नगर शहरानंतर विविध कार्यालयांचं नामांतर

## पोस्ट ऑफिसचे नावही अहिल्यानगर केलं जाणार




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अहिल्यानगर**

गेल्या काही महिन्यांपूर्वी पूर्वीचं अहमदनगर आणि आता शहराचं नामांतर झालं ते अहिल्यानगर. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मगाव या जिल्ह्यामध्ये असल्याने या शहराला आणि जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्याची मागणी होत होती. त्या प्रस्तावाला अखेर केंद्र सरकारने मंजुरी दिली.

त्यानंतर आता शहरातील विविध कार्यालयांची नावे देखील बदलण्यात येत आहेत. यामध्येच टपाल विभागाचे अहमदनगर कार्यालयाचे देखील नाव अहिल्यानगर केले जावे. यासाठी अधिकाऱ्यांकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांना पत्र पाठवण्यात आले आहे. यामध्ये ज्याप्रमाणे शहराचे नाव बदललं त्यानंतर हळूहळू विविध कार्यालयांचे नामांतर होत असताना पोस्ट ऑफिसचे नाव देखील अहिल्यानगर केले जावं अशी मागणी या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी केली आहे.




# दातांमध्ये का येतात झिणझिण्या ?

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

दातांमध्ये झिणझिण्या येण्याची समस्या अनेक कारणांमुळे होऊ शकते. काही वेळा ती सामान्य असते; पण काही प्रकरणांमध्ये ती गंभीर दंत समस्या असल्याचे संकेत देऊ शकते. योग्य स्वच्छता पद्धती आणि दंततज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास ही समस्या टाळता येते. नियमितपणे दंत तपासणी करून वेळीच उपचार करणे महत्त्वाचे आहे.दंतसंवेदनशीलता याकडे व्याधी वा आजार म्हणून पाहिले जात नसले तरी यामुळे तिचे गांभीर्य कमी होत नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२३ च्या अहवालानुसार जगभरातील ३० टक्के लोकांना दंत संवेदनशीलतेची समस्या भेडसावते. यातील बहुतांश प्रकरणे चुकीच्या आहाराच्या सवयींमुळे होतात. जर्नल ऑफ डेंटल रिसर्च अहवाल, २०२२ नुसार ७० टक्के लोक दंत संवेदनशीलता झाली तरी दंततज्ज्ञांकडे जात नाहीत. परिणामी समस्या वाढते. संशोधनानुसार, नॅनो-हायड्रॉक्सीअपाटाईट आणि फ्लोराईड टूथपेस्ट दातांच्या संवेदनशीलतेवर प्रभावी असतात. इंडियन डेंटल असोसिएशनच्या अभ्यासानुसार भारतात ४० टक्के प्रौढांना दंत संवेदनशीलतेची समस्या आहे. यातील ६० टक्के प्रकरणे आंबट आणि गोड पदार्थांच्या जास्त सेवनामुळे होतात. दातांमध्ये झिणझिण्या येणे ही एक सामान्य समस्या असून, याला दंत संवेदनशीलता (टूथ सेन्सिटिव्हिटी ) असे म्हणतात. थंड, गरम, गोड किंवा आंबट पदार्थ खाताना किंवा अगदी थंड वारा लागल्यामुळेही काही लोकांना दातांमध्ये तीव्र झिणझिण्या जाणवतात. काही वेळा ही संवेदनशीलता क्षणिक असते, तर काही लोकांना ती दीर्घकाळ जाणवते.



**झिणझिण्या येण्याची कारणे**

**दंत क्षय** : दातांवर साचलेले अन्न आणि तोंडातील बॅक्टेरिया यामुळे दातांवर प्लाक तयार होतो. हा प्लाक दातांची संरचना कमकुवत करतो. परिणामी दात किडतात आणि संवेदनशीलता कमी होते.

**हिरड्यांची झीज** : वाढत्या वयामुळे किंवा दीर्घकाळ दातांची स्वच्छता केली न गेल्यामुळे हिरड्यांची झीज होते. परिणामी, दातांच्या मुळांचा भाग उघड होतो. हा भाग संवेदनशील असल्याने थंड-गरम पदार्थांमुळे दातांमध्ये झिणझिण्या जाणवू शकतात.

**इनॅमल नष्ट होणे** : जोरजोरात दात घासल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे दातांचे नैसर्गिक कवच म्हणजेच इनॅमल नष्ट होत जाते. यामुळे दातांचा आतील भाग उघड होऊन संवेदनशीलता वाढते.

**दात चावणे** : काही लोक झोपेत किंवा तणावामुळे नकळत दात चावतात. त्याचा करऽऽऽकर्र असा आवाज होतो. यामुळेही इनॅमलची झीज होऊन दात कमजोर होतात.

दातांना तडे जाणे : अपघातामुळे किंवा अतिटणक पदार्थ खाल्ल्यामुळे किंवा जुनाट समस्यांमुळे दातांना तडे जातात, दात तुटतात. याचा दातांच्या आतील नाजूक भागावर परिणाम होऊन ते संवेदनशील बनतात.

**दंतोपचारांचा परिणाम** : काही वेळा फिलिंग, रूट कॅनॉल किंवा व्हाइटनिंगसारख्या उपचारांनंतर काही दिवस दातांमध्ये झिणझिण्या जाणवू शकतात.

# तडजोडीसाठी पुढे आल्यास-जिल्ह्यातील महावितरणची ११ हजार प्रकरणे लोक अदालतीत निकाली निघणार


## अभय योजनेची मुदत ३१ मार्च ; भरघोस सवलतीत लाभ घेण्याची शेवटची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती –** जिल्ह्यात विविध वर्गवारीतील वीज ग्राहकांची ११ हजार ५५५ प्रकरणे तडजोडीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली आहे.तथापि ही सर्व प्रकरणे दाखलपूर्व असल्याने अभय योजनेत लाभ घेण्यास पात्र आहेत.परंतू अभय योजना ३१ मार्चला संपत असल्याने व्याज,विलंब आकारासह अनेक सवलतीत लाभ घेण्याची शेवटची संधी असल्याने या सर्व ग्राहकांनी लोक अदालतीमध्ये सहभाग नोंदवून वादातीत प्रकरणातून कायमची सुटका करावी असे आवाहन अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी केले आहे.

### २२ मार्च राष्ट्रीय लोक अदालत नियोजन

शनिवार दिनांक २२ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालत नियोजित आहे. जिल्हा आणि सर्व तालुका स्तरावर सुरू राहणाऱ्या लोक अदालतीमध्ये तडजोडीकरीता महावितरणची एकुण ११ हजार ५५५ प्रकरणे ठेवण्यात आली असून त्यांच्याकडे त्यांच्याकडे १५ कोटी ३५ लाख रूपये थकले आहे.यामध्ये सर्वात जास्त घरगुती ग्राहकाचा समावेश असून त्याची संख्या १० हजार ७५२ आहे.परंतू प्रकरण वादातीत झाल्यामुळे त्यांच्याकडे ११ कोटी ३४ लाख रूपये थकले आहे.वाणिज्यिक वर्गवारीतील ५४१ ग्राहकांकडे ८० लाख,औद्योगिक वर्गवारीतील १८२ ग्राहकाचा यात समावेश असून त्यांच्याकडे ३ कोटी आणि इतर ८० ग्राहकांकडे २० लाख रूपये थकीत आहे.मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात तसेच सहाय्यक विधी अधिकारी आद्यश्री कांबे यांच्या विशेष पुढाकाराने आणि सर्व विभागीय कार्यकारी अभियंते यांच्या मदतीने ग्राहकांच्या सोयीनुसार तालुकानिहाय नियोजन करण्यात आले आहे.लोक अदालतीत ठेवण्यात आलेल्या प्रकरणातील सर्वच ग्राहकांना नोटीस बजाऊन संबंधित तालूक्यातील लोक अदालतीमध्ये सहभागी होण्याबाबत माहिती देण्यात आली आहे.त्याचबरोबर प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी महावितरणकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्याबाबत विभाग आणि उपविभागीय कार्यालयांना निर्देशही देण्यात आले आहे–




RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २० मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा २२ मार्चला पुरस्कार वितरण सोहळा

## ना. नितीनजी गडकरी आणि दोन उत्कृष्ट महिला शेतकरी होणार सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती** – श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्काराचे वितरण शनिवार दि.२२ मार्च २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात करण्यात येणार असून या समारंभात केंद्रीय दळणवळण व रस्ते वाहतूक मंत्री ना. नितीनजी गडकरी यांना प्रतिष्ठेच्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार २०२४' ने सन्मानित करण्यात येणार आहे.रु. पाच लक्ष रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. विदर्भातील दोन उत्कृष्ट शेतकरी महिलांनाही या सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल.



श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात शनिवार दि.२२ मार्च २०२५ ता सकाळी साडेदहा वाजता संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन प्र. देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्याला केंद्रीय दळणवळण व रस्ते वाहतूक मंत्री ना. नितीनजी गडकरी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून मा. खासदार शरदचंद्र पवार हे प्रमुख अतिथी म्हणून आभासी पद्धतीने उपस्थित राहतील. राज्यसभा सदस्य खा. डॉ. अनिल बोहे, अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे आणि अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके हे या सोहळ्याला अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

या सोहळ्यात मा. खासदार शरदचंद्र पवार साहेबांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील उत्कृर सेतकरी महिलेला 'शारदाबाई पवार उत्कृश महिला शेतकरी पुरस्कार २०२४ आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने श्रीमती विमलाबाई देशमुख शेतीनिष्ठ महिला शेतकरी पुरस्कार २०२४' असे दोन पुरस्कार उत्कृष्ट महिला शेतक-यांना दिल्या जाणार आहेत. रोख रु.१.११.१११/– (रुपये एक लक्ष अकरा हजार एकयो अकरा), स्मृतिचिन्ह, सन्मान केंद्र सरकारने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंती प्रीत्यर्थ प्रसारित केलेले १२५ रुपयांचे नाणे, साठी, चोली, शाल व श्रीफळ असे शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्काराचे स्वरूप आहे तर रु.५१०००/– रोख, स्मृतिचिन्ह, साडी, चोळी, शाल व श्रीफळ असे 'श्रीमती विमलाबाई देशमुख शेतीनिष्ठ महिला शेतकरी पुरस्काराचे स्वरूप आहे. विदर्भातील महिला शेतक–यांसाठीचा हा सर्वात मोठा सन्मान आहे.श्रीमती विमलाबाई देशमुख (वैद्यकीय शिक्षण) अभ्यास क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले शिक्षण अभ्यासवत्ती आणि माध्यमिक शाळेतील खेळाडू विद्यार्थी विद्यार्थिनीला क्रीडासंगातील उल्लेख प्राविण्याबद्धल 'डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्कार देखील या सोहळ्या प्रदान करण्यात येईल.पुरस्कार वितरण सोहळ्यात संस्थेचे उपाध्यक्ष सर्व श्री.क गजानराव पुडकर, अॅड. के.जी. पा पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्य श्री. दिलीपबाबू इगोले, कार्यकारि सदस्य सर्व श्री. हेमंत काळमेघ, प्राचां केशवराव गावडे, सुरेशराब खोट प्रा. सुभाषराव बनसोड, स्वीकृत सदा सर्व श्री. प्राचार्य डॉ. अंबादास कुन्द नरेशचंद्र पाटील, डॉ. पी. एस. वायार डॉ. अमोल महल्ले हे प्रामुख्याने उपस्थि राहणार असून या सोहळ्याला नागरिकों मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, आं विनंती संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे यांनी केली आहे.–

# बोरनदी धरणात उडी घेऊन युवकाने संपविले जीवन

## घटनेने नांदगाव पेठ मध्ये हळहळ, आत्महत्येचे गूढ अद्यापही गुलदस्त्यातच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०नांदगाव पेठ** वाळकी रस्त्यालगत असलेल्या बोरनदी धरणात २३ वर्षीय युवकाने उडी घेऊन जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी (दि.१८) रात्री घडली.यश कुमोद पांडेय रा. गजानन नगर नांदगाव पेठ असे त्या युवकाचे नाव आहे.सार्वजनिक नवदुर्गा संस्थान येथे पुजारी असलेले कुमोद पांडेय यांचा मुलगा असलेला यश मंगळवारी रात्री नऊ वाजताच्या दरम्यान घरून जेवण करून बाहेर गेला तो कायमचाच. रात्री पालकांनी शोधाशोध केल्यानंतर धरणाच्या परिसरात त्याचे वाहन दिसल्याने हा प्रकार उघडकीस आला. बुधवारी सकाळी अग्निशमन दलाच्या चमूने रेस्क्यू करून यशचे शव बाहेर काढले. घटनेची हकीकत अशी की,मंगळवारी रात्री नऊ वाजताच्या दरम्यान यशने आपल्या परिवारासोबत जेवण केले आणि नेहमीप्रमाणे शतपावलीसाठी बाहेर गेला. दरम्यान बराच वेळ होऊनही तो घरी परत न आल्याने आईने





त्यांच्या भ्रमणध्वनी वर संपर्क करण्याचा प्रयत्न केला मात्र तिकडून कोणत्याही प्रतिसाद न मिळाल्याने वडिलांनी आजू बाजूला तसेच मित्रांना फोन करून शहानिशा केली न राहवून त्यांनी व यश च्या मित्रांनी महामार्गाने व धरणाच्या रस्त्याने त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा रात्री साडे अकरा वाजताच्या दरम्यान यश चा मृतदेह पाण्यावर तरंगतांना दिसला. घटनेची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना देण्यात आली मात्र अंधार असल्याने त्याठिकाणी रेस्क्यू करणे कठीण असल्याने बुधवारी सकाळी ९ वाजताच्या अग्निशमन पथकाच्या चमूने यश चे शव बाहेर काढले व रुग्णवाहिकेद्वारे जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले.यश ने आत्महत्या करण्या पूर्वी सुसाईड नोट देखील लिहून ठेवलेली होती मात्र त्यामध्ये आत्महत्या करण्या संदर्भात ठोस कारण नमूद नव्हते मात्र स्वतः काही लोकांचे व मित्रांचे उधार पैसे घेतले होते ते आपण त्यांना परत करावे असा उल्लेख त्यामध्ये होता. अद्याप आत्महत्येचे गूढ गुलदस्त्यात असून पुढील तपास नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार महेंद्र अंभोरे करत आहेत. उत्तरीय तपासणी व शव विच्छेदनानंतर यश चा मृतदेह पालकांच्या स्वाधीन करण्यात आला. दुपारी दीड वाजता येथील मोक्षधाम मध्ये यश च्या मृतदेहावर अंत्य संस्कार पार पडले.घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# हल्दीरामचे एक्सपायरी डेट ताक विकणाऱ्यांवर कारवाई करा

## अन्यथा २६ मार्च आंदोलनमहाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती–**

मुदतबाह्य शीतपेय विकणाऱ्या जिल्ह्यातील दुकानदारांवर कारवाई करावी अन्यथा २६ मार्च रोजी धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने जिल्हाधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे यांच्या नेतृत्वात निवेदन दिले.

पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांना एक्सपायरी तारीख ८ महिन्यांपूर्वी संपलेले हल्दीराम चे मसाला ताक देण्यात आले होते. वालकट कंपाउंड परिसरातील सुगंध डेली निड्स शितपेय विक्रेता रमेश अरोरा या दुकानदारावर अद्यापही कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. जिल्ह्यात अशा प्रकारे एक्सपायरी झालेले थडपेय विकून नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहे. त्यामुळे गोरगरीब नागरिकांना आपला जीव गमवावा लागलो. शहरात नुकतीच घडलेली घटना त्याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.एक आठवडा होवून सुध्दा अन्न व औषध प्रशासन विभागाने कुठलीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे आठ दिवसा मध्ये कारवाई न झाल्यास २६ मार्च रोजी धरणे निदर्शने आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा निवेदनातून दिला आहे. एका आठवड्यात जिल्ह्यातील सर्व दुकानांची तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व त्यांची माहिती प्रसार माध्यमांना देण्यात यावी, अन्यथा २६ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल. असा इशारा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भाध्यक्ष नयन मोंढे यांनी निवेदनातून दिला आहे.निवेदन देताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, शहराध्यक्ष विक्रम ढोके. विनोद इंगळे, नकुल नाईक, सोमेश्वर जेवडे, संजय तायडे, सुधीर गणवीर, पी. एन.देशमुख, राजा वानखडे, नितीन मुळे, धनराज खर्चान, संजय मोहोड, मिनाक्षी कोल्हे, अर्चना रक्षे उपस्थित होते.

### कारवाइ करा अन्यथा आंदोलन

नयन मोंढेनागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या दुकानदारांवर कारवाई होणे आवश्यक आहे. दरवर्षी लाखो रुपयांची उलाढाल असणाऱ्या शितपेये विक्रीच्या व्यवसायाव्दारे नागरिकांना विविध आजारांची लागण होत असते. याला जिल्हा प्रशासन जबाबदार आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने जिल्ह्यातील सर्व शितपेय विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करून कारवाई करावी व किती दुकानांवर कारवाई केली, कोणती कारवाई केली, त्याची माहिती प्रसार माध्यमांना देण्यात यावी अन्यथा २६ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भाध्यक्ष नयन मोंढे यांनी दिला आहे.

# कारागृहात कैद्यांच्या दोन गटात तुफान हाणामारी

## कर्मचारी किरकोळ जखमी,दोन्ही गटातील कैद्यांविरोधात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०विदर्भ–** प्रजासत्ताक ३अमरावती मध्यवर्ती कारागृहात मंगळवारी सायंकाळी कैद्यांच्या दोन गटात तुफान हाणामारी होत असल्याचे पाहताच तुरुंग पोलिसांनी दोन्ही गटाचे भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु दोन्ही गटातील कैद्यांनी कर्मचाऱ्यांवरच पलटवार केल्याने काही कर्मचाऱ्यांना किरकोळ मार लागला. कारागृह प्रशासनाने फ्रेजरपुरा ठाण्यात यासंदर्भात तक्रार दिली.

अमरावती कारागृहात गतवर्षी पुण्याची कोयता गॅग व स्थानिक कैद्यांमध्ये वर्चस्वाच्या लढाईतून भांडण झाले होते. कारागृह प्रशासनाने दोन्ही गटातील कैद्यांना वेगवेगळ्या बरॅकमध्ये ठेवले होते. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या परतवाडा व अमरावती येथील कैद्यांमध्ये मंगळवारी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास पाण्यावरून वाद झाला. वाद इतका वाढला की दोन्ही गटातील कैद्यांनी एक दुसऱ्यावर तुफान हल्ला चढविला. दोन्ही गटातील




४० ते ५० कैदी एक दुसऱ्याला जबर मारहाण करीत असल्याचे पाहताच तैनात तुरूंग कर्मचाऱ्यांनी वाद सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु कैद्यांनी कर्मचाऱ्यांना लोटलाट केली. पोलीस कर्मचाऱ्यांनी सतर्कतेसाठी शिट्टी वाजविताच कारागृहातील अन्य कर्मचारी तेथे पोहोचले आणि सैम्य बळाचा वापर करून भांडण सोडविले. ज्या दोन गटात वाद झाला होता. त्यांना वेगवेगळ्या बेरेक मध्ये ठेवण्यात आले होते.कारागृह अधिकाऱ्यांनी या पूर्ण प्रकरणाची माहिती घेतली. तसेच कारागृहातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी करून फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणात फ्रेजरपुरा पोलिसांनी कारागृह कर्मचारी प्रमोद महाजन यांच्या तक्रारीवरून दोन्ही गटातील कैद्यांविरुध्द गुन्हा दाखल केला.

# कोरटकरला अटक करण्यासाठी कोल्हापूर पोलिसांचे पथक नागपुरात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह बोलून इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना अश्लिल शिवीगाळ करणाऱ्या तथाकथित पत्रकार आरोपी प्रशांत कोरटकर याला अटक करण्यासाठी कोल्हापूर पोलिसांचे पथक नागपूरच्या दिशेने रवाना झाले आहे, अशी माहिती कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी दिली. कोरटकरला कोणत्याही क्षणी कोल्हापूर पोलीस अटक



करु शकतात.

इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी ब्राह्मण समाजाचा द्वेष केल्याचा आरोप करीत तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याने फोन करून थेट जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत सावंत यांनी एक 'कॉल रेकॉर्डिंग' फेसबुकवर शेअर केली होती. ज्यामध्ये जिथं असाल तिथे येऊन ब्राह्मणांची ताकद दाखवू, तुम्ही कितीही मराठे एकत्र करा, असे म्हणत या कोरटकर यांनी सावंतांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली होती. तसेच कोरटकर याने राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले असे या ध्वनिफीत मधून दिसून येते.या प्रकरणी कोल्हापुरातील जुना राजवाडा पोलीस ठाण्यात प्रशांत कोरटकरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी एका पोलीस उपनिरीक्षकाच्या नेतृत्वात पथक बुधवारी दुपारी नागपूरच्या दिशेने निघाले. उद्या गुरुवारी कोरटकरचा सायबर पोलिसांच्या मदतीने शोध घेणार आहेत. त्याला अटक करुन कोल्हापूर पोलीस घेऊन जाणार आहेत. कोरटकरचा कोल्हापूर पोलिसांनी अटकपूर्व जामीन फेटाळला. त्यामुळे पोलिसांचा कोरटकरला अटक करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, तो गेल्या महिन्याभरापासून पोलिसांच्या हातावर तुरी देऊन लपून बसला आहे.

### रिकाम्या हाताने परतले होते कोल्हापूर पोलीस

यापूर्वीसुद्धा कोल्हापूर पोलिसांचे पोलीस उपनिरीक्षक संतोळ गळवे यांच्या नेतृत्वातील पथक नागपुरात आले होते. त्यावेळी त्यांनी कोरटकरच्या घरावर छापा घातला होता. त्यानंतर सायबर पोलिसांच्या मदतीने काही ठिकाणी छापेमारी केली होती. मात्र, कोरकटर मिळून आला नव्हता. त्यामुळे कोल्हापूर पोलिसांच्या पथकाला रिकाम्या हाताने परतावे लागले होते, हे विशेष

# शहरातील १०% लोकवस्तीतून चिमणी गायबः सर्वेक्षणात निघाला निष्कर्ष

## शहरातील विद्यार्थी होत आहेत रक्षक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अकोला–**

शहरातील १० टक्के लोकवस्तीमध्ये चिमण्यांचे अस्तित्व दुर्मिळ झाल्याचे चित्र आहे. अकोला येथे नुकतेच चिमणी दिनानिमित्त सर्व्हेक्षण झाले. यात ३२ टक्के लोकांकडे दिवसाला ५ ते १०, ३६ टक्के लोकांकडे १० ते २०, २४ टक्के लोकांकडे ५० ते १००, १० टक्के लोकांकडे चिमण्या दिसत नसल्याचे पुढे आले आहे.

निसर्गकट्टा, शिक्षणाधिकारी, वन विभाग , सामाजिक वनीकरण विभाग व महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन चिमणी गणनेचे आयोजन केले होते. यावर्षी ५६.२ टक्के लोकांना चिमणी गणनेची माहिती शालेय व महाविद्यालयीन स्तरावरून सहभाग घेतला, तर ४३ टक्के लोकांना सोशल मिडियाच्या माध्यमातून माहिती मिळाली. ९८० चिमणीप्रेमींनी सर्वेक्षण भाग घेतला. या गणनेत १० प्रश्न विचारले होते. यात महत्त्वपूर्ण माहिती प्राप्त झाली. चिमण्यांच्या संरक्षणासाठी विद्यार्थ्यांसह अनेक संस्था पुढे येत आहे. सर्व्हेक्षणातील ८० टक्के लोकांनी चिमणीसाठी पाण्याचे भांडे धान्य ठेवले आहे. तसेच ४५ टक्के लोकांना चिमणीसाठी कृत्रिम घरटे लावले आहे. ज्या परिसरात भरपूर चिमण्या आहेत त्या भागात ६२ टक्के झाडं आहेत. ज्या भागात चिमण्या जास्त दिसतात पण तिथे त्यांना घरटे नाही अशा भागात निसर्गकट्टाद्वारे कृत्रिम घरटे लावण्यात येणार आहे. केवळ चिमण्यांची आकडेवारी न काढता चिमणी संवर्धनासाठी किती लोक



जागृत आहे हे पाहणे, हा या सर्वेचा मुख्य उद्देश होता. अकोल्यात सुरू झालेला हा उपक्रम यावर्षी बुलडाणा, यवतमाळ, जालना, वाशीम व नाशिक जिल्ह्यातही आयोजित करण्यात आला.– अमोल सावंत, संस्थापक, निसर्ग कट्टा. राजेश्वर कॉन्व्हेंट, प्लॅटिनम ज्युबिली स्कुल, समर्थ पब्लिक स्कुल, सन्मित्र पब्लिक स्कुल, जिजाऊ कन्या शाळा, श्री सहदेवराव भोपळे विद्यालय, हिवरखेड, जि. प. विद्यालय, कान्हेरी सरप, जि. प. विद्यालय राजुरा घाटे, जे. आर. डी. टाटा एड्युलॅब व आर. एल. टी. च्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

सर्व्हेक्षणात पुढे आलेले काही निष्कर्ष असे गणनेत भाग घेतलेल्या ३२ टक्के लोकांकडे दिवसाला ५ ते १०, ३६ टक्के लोकांकडे १० ते २०, २४ टक्के लोकांकडे ५० ते १००, १० टक्के लोकांकडे चिमण्या दिसत नाही. ३६ टक्के लोकांकडे १२ ही महिने चिमण्या दिसतात, त्यात उन्हाळ्यात २५ टक्के लोकांकडे, पावसाळ्यात २३ टक्के लोकांकडे हिवाळ्यात २४ टक्के लोकांकडे चिमण्या दिसतात.

# २५० खाटांच्या सुपर स्पेशालिटी हृदय रुग्णालयाचे उद्घाटन

## केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते नव्या ८ मजली इमारतीचे होणार लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

पश्चिम विदर्भातील हृदय विकारग्रस्त रुग्णांसाठी आधुनिक वैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा गाठत श्री संत अच्युत महाराज हार्ट रुग्णालय आता २५० खाटांचे अत्याधुनिक सुपर स्पेशलिटी हृदय रुग्णालय म्हणून कार्यरत होत आहे. या रुग्णालयाच्या नवीन आठ मजली इमारतीचे उद्घाटन व द्वितीय कॅथलॅबचे लोकार्पण शनिवारी २२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे.

या सोहळ्याला राज्य आणि केंद्र शासनातील मान्यवर, वैद्यकीय क्षेत्रातील प्रमुख तज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी आणि समाजसेवी व्यक्ती उपस्थित राहणार आहे. अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष सुधीर दिवे यांनी पत्रकार परिषदेतश्री संत अच्युत महाराज यांनी महाराजांनी लोकवर्गणीतून, सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार लोकसहभागातून दहा रुपये प्रति



आरोग्यसेवा मिळाव्यात. या वीट उपक्रमातून राज्यस्तरीय विचाराने प्रेरित होऊन आरोग्यसेवा आरोग्य सेवेचा प्रवास केला. क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले संत अच्युत महाराजांनी हा आहे. आज ते हार्ट हॉस्पिटल उपक्रम हाती घेतला होता. म्हणून उदयास आले आहे. जनतेच्या सहभागातून हृदयरुग्णालयाचे पहिले पाऊल पडले. श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल हे पश्चिम विदर्भातील सर्वात मोठे हृदय उपचार केंद्र म्हणून स्थान मिळवले असल्याचे आयोजकांनी पत्रकार परिषदेत सांगितले. सात जुलै २००६ ते १४ मार्च २०२५ या कालावधीत रुग्णालयात ३ हजार ३७१ ओपन हार्ट शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या आहेत. तसेच औजओप्लास्टी १८८०२, औजओग्राफी ३६८७५, आय व्ही फिल्टर ६९, पेसमेकर प्रत्यारोपण ३८१ यासारख्या ६४ हजार ३१० उपचार प्रक्रिया रुग्णालयाने केल्या असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर यांनी दिली. या वेळी पत्रकार परिषदेला अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर, संत सचिनदेव महाराज, सागर पासेबंद, मुकुंद वाईकर, डॉ मुरलीधर वाडेकर, डॉ. गुणवंत डहाने, दत्ताजी शिंदे आदी उपस्थित होते.

### नवीन इमारतीत विशेष सुविधा राहणार

नवीन आठ मजल्या इमारतीत रुग्णांसाठी विशेष सुविधा असणार आहे.

यात दोन नवीन सीव्हिटीएस शस्त्रक्रिया विभाग, २ नवीन कॅथलॅब, २५ विशेष कक्ष (सिंगल, डबल), ६५ आयसियु खाटा, ३५ खाटांचे सीव्हिटीएस वार्ड, ३५ खाटांचे कार्डिओलॉजी वार्ड, संपूर्ण इमारत वातानुकूलित, आरओ पाणी व स्वच्छता व्यवस्था आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे.-

# येवदावासीयांना १४ एप्रिलपासून होणार

## एक दिवस आड पाणीपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०येवदा दर्यापूर-**

ग्रामपंचायतच्या पाठपुराव्यामुळे अखेर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा.) प्रशासनाने येणाऱ्या १४ एप्रिलपासून येवदा गावात एक दिवस आड पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले आहे. स्थानिक प्रशासनाच्या मागणीवर ग्रामपंचायत कार्यालयात मजीप्राच्या अधिकाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत 'मजीप्रा'च्या अधिकाऱ्यांनी गावातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा केली. मात्र, ग्रामपंचायत प्रशासनाने ठाम भूमिका घेत अधिकाऱ्यांना तातडीने निर्णय घेण्यास भाग पाडले. या वेळी दर्यापूर विभागाचे उपविभागीय अधिकारी विजय शेंडे, कनिष्ठ अभियंता अभय देशमुख, कंत्राटदार आणि ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार, १४ एप्रिलपासून नियोजित वेळापत्रकानुसार गावात एक दिवस आड पाणीपुरवठा केला जाणार आहे. तसेच, गावातील विविध ठिकाणी असलेल्या पाणी गळतीच्या समस्या तत्काळ सोडवण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. बाजारातील पाण्याच्या जुन्या टाकीचे नूतनीकरण करण्यात येणार असून, पाइपलाइन जोडणी लवकरात लवकर दुरुस्त करण्याची करण्यात येणार आहे. सरपंच अमानुल्ला खाँ दिलावर खाँ यांनी १४ एप्रिलपर्यंत दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी न झाल्यास ग्रामपंचायत प्रशासन मजीप्रावर कठोर कारवाई करेल, असा इशारा या बैठकीत दिला.

ग्रामस्थांनी केले समाधान व्यक्त गावकऱ्यांसाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची ठरली असून, येवदा गावातील नागरिकांना आता



नियोजनबद्ध आणि नियमित पाणीपुरवठा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बैठकीला ग्रामपंचायत सरपंच अमानुल्ला खाँ दिलावर खाँ, ग्रामपंचायत अधिकारी अरुण रायबोले, सुयोग टोबरे, प्रदीप वडतकर, श्याम ठाकरे, अनिकेत खेडकर, गुड्डू जहागीरदार यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

# निवडणुकीत महिला उमेदवाराच्या नावात बदल आता शक्य

## नाव विवाहापूर्वीचे की विवाहानंतरचे निवडणूक आयोगाकडून संभ्रम निकाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविणाऱ्या विवाहित महिलांबाबत मतदार



यादीत असलेल्या नावानेच उमेदवारी अर्ज करावा लागत असे. आता मात्र महिलांना उमेदवारी अर्जावर विवाहापूर्वीचे की विवाहानंतरचे नाव असावे, याबाबतचा संभ्रम दूर झाला. यासाठी संबंधित महिलेला उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवसापर्यंत आवश्यक पुराव्यासह विनंती अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करता येईल. राज्य निवडणूक आयोगाने ही सुविधा १३ मार्चच्या आदेशाने उपलब्ध केल्याने महिला उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक उमेदवाराचे नाव संबंधित मतदार यादीत असणे आवश्यक अर्हता आहे. त्यामुळे महिला उमेदवारांना त्यांच्या संबंधित मतदार यादीत असलेल्या नावानेच उमेदवारी अर्ज दाखल करावा लागत होता. आता मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या विवाहित महिला उमेदवारांना मतदार यादीत व उमेदवारी अर्जात नमूद नावाखेरीज त्यांना मतपत्रिकेवर इतर नावाचा उल्लेख करण्याची इच्छा असेल तर तो बदल आता करता येणार आहे.

मात्र यासाठी आवश्यक पुरावे विनंती अर्जासोबत जोडावे लागतील. त्यानंतर वैध उमेदवारांच्या अंतिम यादीत व मतपत्रिका तयार करताना या सुधारित नावाचा समावेश करण्याचा निर्णय निवडणूक निर्णय अधिकारी घेतील. यामध्ये यादीतील नावापुढे विवाहानंतरचे / पूर्वीचे नाव कंसात छापण्याची परवानगी देण्यात येणार आहे. यामध्ये ईव्हीएमवर नाव मुद्रित करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागेचा व विहीत फॉडचा वापर होईल, याची दक्षता घेण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.

### अर्जासोबत हे पुरावे आवश्यक

ज्या नावाचा उल्लेख निवडणूक लढविण्यासाठी करावयाचा आहे, त्याच्या पुष्ठ्यर्थ विवाह नोंदणी प्रमाणपत्र, राजपत्रात प्रसिद्ध विवाहानंतरचे नाव आदी सादर करणे अनिवार्य आहे. सदर राजपत्र उपलब्ध नसल्यास मतदाराने मतदान करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये १७ पुराव्यांपैकी महिला उमेदवारास हव्या असलेल्या नावासहित छायाचित्र असलेला कोणताही एक पुरावा जोडणे आवश्यक आहे. यावर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेतील.

# रविवारी १४,७५४ आजी-आजोबा देणार परीक्षा:१५० गुणांचा पेपर

## नवभारत साक्षरता कार्यक्रमाद्वारे ज्येष्ठही होणार साक्षर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती-** नवभारत साक्षरता अभियानांतर्गत जिल्ह्यातील १४ हजार ७५४ आजी-आजोबा रविवार २३ रोजी परीक्षा देणार आहेत. नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत मागील एका वर्षापासून निरक्षरांची नोंदणी करून त्यांना प्राथमिक धडे देण्यास सुरुवात केली आहे. आता परीक्षा घेऊन त्यात जे उत्तीर्ण होतील, त्यांना साक्षर असल्याचे प्रमाणपत्र दिले जाणार आहे. गेल्या वर्षी ८ हजारावर निरक्षरांनी साक्षर होण्याचा आनंद मिळवला. यंदा ज्येष्ठ निरक्षरांनी ज्या शाळांमध्ये नोंदणी केली आहे तेच त्यांचे परीक्षा केंद्र असणार आहे. शिक्षणाची इच्छा असतानाही शाळेत जाऊन शिकता



आले नाही. किंवा काही कारणास्तव शिक्षणाकडे लक्षच गेले नाही. परंतु, आता फावला वेळ असल्यामुळे तसेच किमान स्वत:चे नाव लिहिता वाचता येईल. संख्या ओळखता येतील. साधी बेरीज, वजाबाकी करता येईल, इतपत शिक्षण ज्येष्ठ नागरिकांना देण्यात आले असून यावरच त्यांना परीक्षाही द्यायची आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर ते खरेच साक्षर झालेत असे समजले जाईल. देशात कोणीही निरक्षर राहू नये, यासाठी केंद्र शासनाने नवभारत साक्षरता कार्यक्रमाला सुरुवात केली आहे. असा असेल पेपर १५० गुणांच्या पेपरमध्ये वाचन, लेखन आणि संख्येचे ज्ञान असे प्रत्येकी ५० गुणांचे प्रश्न राहतील. उत्तीर्ण होण्यासाठी तिन्ही प्रकारात ३३ टक्के अर्थात १७ गुण आवश्यक आहेत. परीक्षक ५ गुण वाढवून देऊ शकतात. विशेष बाब अशी की, सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत कोणत्याही वेळी किंवा शाळांनी निश्चित केलेल्या वेळात निरक्षर शाळेत जाऊन परीक्षा देऊ शकतात. दिव्यांग निरक्षरांना यासाठी ३० मिनिटे जास्त वेळ देण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा आयोजकांकडून देण्यात आली.

# चांदूरबाजार येथे अवैध सावकाराच्या घरावर धाड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०चांदुर बाजार -**

जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या निर्देशावरून मोर्शी सहाय्यक निबंधक कार्यालयाने अवैध सावकारांच्या घरावर धाड घातली या कारवाईमध्ये निबंधक कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांना कोरे धनादेश प्राप्त झाले. चांदूबाजार तालुक्यातील ईश्वरदास ठाकरे यांच्या घरी व दुकानावर एकाचवेळी ही धडक कारवाईकरण्यात आली.

अवैध सावकारी सुरू असल्याची तक्रार सहाय्यक



निबंधक कार्यालय मोर्शी येथे प्राप्त झाली. जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी दोन पथक तयार करून तात्काळ छापामार कारवाई करण्याचे आदेश दिले. सहाय्यक निबंधक राजेश भुयार यांच्या नेतृत्वात सुधीर मानकर, स्विटी गवई, नंदकिशोर दहीकर, ओमप्रकाश बोराळकर व पोलीसपथक सकाळी ११ वाजून ५६ मिनिटांनी चांदूरबाजार सराफा लाईन येथे दुकानावर धडकले. दुपारी १.२० पर्यंत सुरू असलेल्या या कारवाईमध्ये दोन स्वाक्षरी असलेले कोरेधनादेश प्राप्त झाले, मात्र कुठेही आक्षेपार्ह दस्तावेज आढळून आले नाही. तर दुसरी कारवाई सहाय्यक निबंधक स्वरूपा जुमळे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांनी सुरू झालेली ही घाडीची कारवाई बेलोरा रोड काकडेपुरा येथे असलेल्या त्यांच्या राहते घरी टाकण्यात आले. या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे आक्षेपार्ह संशस्यास्पद दस्तावेज आढळून आले नाही. या प्रकरणात महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ मधील तरतुदीनुसार पुढील चौकशी करण्यात येणार आहे.

# चंडीकापूर पाणी टाकीवरून खोलापूर गावात पाणी पुरवठा सुरळीत करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०दर्यापूर** - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अतर्गत चंडीकापूर टाकीवरून खोलापूर तसेच इतर गावांना शहानुर योजनेचे पाणी पुरवठा होतो परंतु काही दिवसापासून ५ दिवसानंतर व पाणी पुरवठ्याचा वेळ माहित होत नसल्यामुळे कधी रात्री तर कधी दुपारी ५ व्या दिवशी पाणी पुरवठा केला जातो. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असून पाण्या अभावी नागरिकांचे हाल होत आहेत.हा भाग खारपानपट्टा असल्यामुळे भूगर्भात खारे पिण्यास अयोग्य पाणी लागत असल्यामुळे दुसरा पर्याय सुद्धा नागरिकांना उपलब्ध नाही जीवन प्राधिकरणाचे स्थानिक कर्मचारी यांना फोन केल्यास फोन सुद्धा उचलत नाही त्यामुळे नळाला केव्हा पाणी येईल हे समजण्यास मार्ग नसल्यामुळे त्यांचे पाण्याअभावी हाल होत आहे त्यामुळे नागरिकांत तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.विशेष करूननळाला १ दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात यावा, चंडिकापूर टाकीमध्ये खारे बोर चे



पाणी मिसळू नये,पाणी सोडण्याच्या वेळा निश्चित करण्यात याव्या,आकस्मिक घटनेने पाणी पुरवठा खंडित होत असल्यास तशी सूचना जाहिरात किवा स्थानिक मोबाईलवर देण्यात यावी अशा मागणीचे निवेदन शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अमरावती महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ अलका निलेश पारडे, सेवानिवृत्त शिक्षक शफीक सर,भारतीय जनता पक्षाचे सदस्य वसंतराव इंगळे व अरुण गाडे यांनी उपविभागीय अभियंता श्री शेंडे यांना देण्यात आले त्यावर श्री शेंडे यांनी आमच्याकडे कर्मचारी नसल्याने व जवळपास १० जागा शासनाने भरल्या नसल्याने काम करण्यास अडचण निर्माण होत आहे,त्या भरण्यासाठी आम्ही खासदार बळवंत वानखडे व आमदार गजानन लवटे यांना पत्र दिले आहे अजून पर्यंत जागा शासनाने भरल्या नाही परंतु आम्ही खोलापूर वासियांच्या ज्या मागण्या आहेत त्या लवकरात लवकर पूर्ण करू व त्या बाबतीत आतापासून काम सुरू करणार आहों व भविष्य काळात तुम्हाला त्रास होणार नाही याची काळजी घेऊ असे सांगितले त्यावेळी त्यांच्या सोबत कनिष्ठ अभियंता अभय देशमुख व निलेश पारडे उपस्थित होते.

# येवदा स्मशानभूमीत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०दर्यापूर** - बुधवारी सकाळी ७ वाजता चे सुमारास येवदा येथील स्मशानभूमीत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडला. मृतदेह परिसरातील स्थानिक नागरिकांनी पाहिल्यावर पोलीस प्रशासनाला या बाबत माहिती दिली. घटनास्थळी पोलिसांनी दाखल होऊन मृतदेह ताब्यात घेऊन



उत्तरीय तपासणी करिता दर्यापूर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविला असून, मृत व्यक्तीच्या ओळखीचा शोध सुरू आहे. पोलीस निरीक्षक विवेक देशमुख यांनी सांगितले की, मृत व्यक्ती वयोमानाने अंदाजे ६०- ६५ वर्षेची असू शकते. स्मशानभूमीत मृतदेह सापडल्यामुळे ही घटना स्थनिकांच्या चर्चेचा विषय बनली . घटना स्थळी नागरिकांनी एकच गर्दी केली होती. पोलीस आता या प्रकरणाचा तपास करत आहेत आणि त्या व्यक्तीच्या ओळखीचा शोध घेण्यासाठी सर्वत्र माहिती घेण्यात येत आहे.याबाबत अधिक माहिती पोलीस प्रशासनाच्या तपासानंतरच उपलब्ध होईल.

# दिशा सालियन आत्महत्या प्रकरण, वडिलांची मुंबई उच्च न्यायालयात याचिका

## आदित्य ठाकरेंविरुद्ध एफआयआर आणि सीबीआय चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी दिशाच्या मृत्यूची नव्याने चौकशी करण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी बुधवारी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

या याचिकेत शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची आणि तपास सीबीआयकडे सोपवण्याची विनंती करण्यात आली आहे. दिशावर सामूहिक बलात्कार करण्यात आला आणि नंतर तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे.८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड परिसरातील १४ व्या मजल्यावरून पडून दिशाचा मृत्यू झाला. पोलिसांनी याला आत्महत्या म्हटले होते. त्यावेळी दिशाच्या वडिलांनी तपास समाधानकारक मानला होता.भाजप नेते नितेश राणे यांनी तीन वर्षांपूर्वी दिशावर सामूहिक बलात्कार आणि हत्या केल्याचा आरोप केला होता. तथापि, दिशाच्या पालकांनी नितेश राणे यांच्या विरुद्ध खटला दाखल केला होता आणि हा त्यांच्या मुलीची बदनामी करण्याचा कट असल्याचे म्हटले होते.आता दिशाचे वडील म्हणतात की, त्यांना घरात नजरकैदेत ठेवण्यात आले आणि पोलिसांनी सादर केलेल्या पुराव्यांवर विश्वास ठेवण्यास भाग पाडण्यात आले. याचिकेत सूरज पंचोली, दिनो मोरिया आणि मुंबई पोलिसांवरही गंभीर आरोप करण्यात आले आहेत.



दिशाच्या वडिलांच्या याचिकेनंतर महाराष्ट्रात राजकारण तापले आहे. कॅबिनेट मंत्री नितेश राणे म्हणाले, 'आदित्य ठाकरे यांनी आमदारपदाचा राजीनामा द्यावा आणि चौकशीला सामोरे जावे.'

**शिवसेना ठाकरे गटाला कट रचल्याचा संशय**

अचानक हा मुद्दा पुन्हा उपस्थित करण्यामागे कट असल्याचा संशय शिवसेनेना ठाकरे गटाने व्यक्त केला आहे. पक्षाच्या प्रवक्त्या आणि मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, 'यामागे एक कट आहे. चार वर्षांहून अधिक काळानंतर हे प्रकरण बातम्यांमध्ये कसे आले? या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी आधीच स्थापन करण्यात आली आहे.त्याच वेळी, महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी त्यांच्या पूर्वीच्या आरोपांचा पुनरुच्चार केला. ते म्हणाले की, मी पहिल्या दिवसापासून सांगत आहे की दिशा सालियनची हत्या झाली आहे. सीसीटीव्ही फुटेज नष्ट करण्यात आले आणि सोसायटीच्या अभ्यागत नोंदणीची पाने फाडण्यात आली.

**राणेंनी केली सीबीआय चौकशीची मागणी**

नितेश राणे यांनी या प्रकरणात आधीच अनेक आरोप केले आहेत. यामुळे त्यांनी सीबीआय चौकशीची मागणीही केली होती. सुमारे २ वर्षांपूर्वी राणे म्हणाले होते, 'दिशाने डायल १०० वर मदत मागितली होती आणि सर्व काही सांगितले होते. पोलिसांना नक्कीच माहिती असेल कारण तो एक रेकॉर्ड केलेला कॉल होता.ते म्हणाले होते की, 'मुंबई पोलिस तीला मदत करू शकले नाही, त्यामुळे त्यांच्यावरही प्रश्न उपस्थित होतात.' मी तुम्हाला एक लीड देत आहे. याची सीबीआय चौकशी करावी. जर सीबीआयला हवे असेल तर मी त्यांना मदत करण्यास तयार आहे.यापूर्वी नितेश राणे यांनी गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून दिशाचा प्रियकर रोहन राय याला सुरक्षेची मागणी केली होती. दिशा आणि सुशांतच्या मृत्यूच्या चौकशीसाठी रोहनचे विधान खूप महत्वाचे ठेल असे त्यांनी लिहिले होते. यामुळे अनेक दुवे उघडू शकतात कारण हे निश्चित आहे की दोघांचेही मृत्यू एकमेकांशी जोडलेले आहेत.

**राणे यांनी ३ वर्षांपूर्वी हा मुद्दा उपस्थित केला होता**

सुमारे ३ वर्षांपूर्वी नितेश राणे यांनी दिशा सालियनच्या मृत्यूबाबत अनेक आरोप केले होते. राणे यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे अँटिलिया प्रकरणात तुरुंगात असलेल्या बडतर्फ पोलिस अधिकारी सचिन वाझेशी देखील या प्रकरणाचा संबंध जोडला होता.

# आपण मंत्री असतो तेव्हा संयमानेच बोलले पाहिजे

## देवेंद्र फडणवीसांनी अटल बिहारी वाजपेयींचा दाखल देत नीतेश राणेंना दिला सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

औरंगजेबाच्या कबरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण रंगले आहे. याच दरम्यान, नागपूरमध्ये दंगलीची घटना घडली. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तीव्र टीका होत आहे. त्यावर भाजपकडून प्रत्युत्तर देण्यात येत आहे. अशात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी विविध प्रश्नांवर दिलखुलासपणे उत्तरे दिली आहेत.



या मुलाखतीमध्ये एका प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अटल बिहारी वाजपेयींचा दाखला देत मंत्री नीतेश राणे यांना संयम बाळगण्याचा सल्ला दिला आहे. तुम्ही मंत्री आहात, त्यामुळे तुम्ही ज्या ठिकाणी बोलता, तेव्हा संयम राखूनच बोलले पाहिजे, असे फडणवीस म्हणाले. लोकमत वृत्तसंस्थेच्या एका पुरस्कार सोहळ्यात दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

**पवार- ठाकरेंचा काही भरवसा नाही**

जयंत पाटील यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याबाबतही देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे दोन-दोन वाक्यात तुम्ही कसे वर्णन कराल? असा प्रश्न जयंत पाटलांनी विचारला. यावर देवेंद्र फडणवीस यांनी एका वाक्यात उत्तर दिले. फडणवीस म्हणाले की, एका वाक्यात उत्तर देतो. वाईट वाटून घेऊ नका. काही भरवसा नाही. या वाक्यात दोघांची देखील वागण्याची पद्धत आली. काही भरवसा नाही.

**विरोधी पक्षही प्रगल्भ असला पाहिजे**

विरोध पक्ष कसा असावा, यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लोकशाहीमध्ये चांगला विरोधक असणे महत्त्वाचे आहे. शेवटी लोकशाही जर प्रगल्भ व्हायची असेल, तर सत्तारुढ पक्षासोबत जो काही विरोधी पक्ष आहे, तोही प्रगल्भ असला पाहिजे. अगदी सांगायचं झाले, तर जयंतराव तुम्ही आज विरोधी पक्षात आहात. तुमच्यासारखे लोक, पवार साहेबांसारखे लोक जर केंद्रामध्ये प्रमुख विरोधी पक्ष असते, तर कदाचित त्यात प्रगल्भता दिसली असती. पण, आज दुर्दैवाने केंद्रात विरोधी पक्षात ती प्रगल्भताच दिसत नाही आणि जर केंद्रात प्रगल्भता नसेल... म्हणजे आपली वेगवेगळी मते असू शकतात, पण त्याचा अर्थ हा नाहीये की, प्रत्येक गोष्टीला विरोधच केला पाहिजे, अशी भूमिका देवेंद्र फडणवीसांनी मांडली.

# नागपुरातील दंगलीत अल्पवयीन आरोपींचादेखील समावेश

## ५७ कलमांअंतर्गत गुन्हे दाखल, पोलिसांवर पेट्रोल बॉम्ब फेकल्याचे स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नागपूर**

सोमवारी रात्री महाल व हंसापुरीमध्ये झालेल्या जाळपोळीच्या घटना व दंग्यांमध्ये बाहेरील तत्त्व सहभागी असल्याच्या चर्चांनी जोर पकडला होता. मात्र, प्रत्यक्षात सर्वच आरोपी हे नागपुरातील असल्याची बाब स्पष्ट झाली आहे. परंतु सर्व आरोपी महालातील नव्हते. चिटणीस पार्क परिसरात झालेल्या दंगलीत पारडी, जाफरनगर, बंगाली पंजा, गोरेवाडा, पारडी येथूनदेखील समाजकंटक पोहोचले होते. आश्चर्याची बाब म्हणजे आरोपींमध्ये अल्पवयीन मुलांचादेखील समावेश होता. तसेच आरोपींनी कर्तव्यावर असलेल्या महिला पोलिसांचा विनयभंग करत पोलिसांवर पेट्रोल बॉम्बदेखील फेकल्याची बाब समोर आली आहे. आरोपींविरोधात एकूण ५७ कलमांअंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.



सोमवारी सायंकाळी एक गट छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ एकत्रित आला व तेथे अनेकांच्या हाती शस्त्रे होती. धार्मिक घोषणा देत शिवीगाळ करण्यात येत होती. घटनास्थळ महाल असले तरी तेथे शहराच्या विविध भागांतून समाजकंटक पोहोचले होते. सीसीटीव्ही फुटेज व सोशल माध्यमांवरील व्हिडीओजच्या माध्यमातून अनेकांची ओळख पटविण्यात आली. पोलिसांनी यासी शेख मोहम्मद शरीफ, शेख फयाज शेख फिरोज, शेख अहफाज शेख फिरोज, मो.अल्ताफ मो.युसूफ, मो.जुमान रजाक, अब्दुल अमन पठाण, मो.इक्बाल ईस्माईल अन्सारी, मो.इजाद मो.इस्माईल, मो.अक्सार मो.ईस्माईल, मो.इजहार मो.ईस्माईल, शेख आबीद शेख नासीर, फैजान समीन शेख, अदनान समीन शेख, इमानुद्दीन शेख, अशफाक खान, काशीफ खान बशीर खान, इरफान अहमद कुरेशी, अल्ताफ मो.अनिस, वसीम रजा खान, नदीम खान रफीक खान, अब्दुल मैफुज अब्दुल वाहीद, मो.शेख हसन शेख, शेख अक्रम शेख अख्तर, अमीर रजा खान, अदनान अली युसूफ अली, शेख रियाज अब्दुल रशीद, दानिश खान, मो.अयाज मो.अयुब, शेख असरार शेख असलम, फैजन अमीन अन्सारी, मो.इम्रान मुजीब अशरफ, मो.अन्सारी, नसरुद्दीन शेख, अब्दुल अदनान अब्दुल वहीद, इबादुल्ला खान, वसीम शेख, शेख इम्रान शेख मुख्तार, मो.आवेज अन्सारी, सैफ अली खान, शेख नादीम शेख सलीम, मो.शाहनवाज, मो.हरीस उर्फ मो.ईस्माईल, युसुफ शेख उर्फ अब्दुल हफीज, शेख सादीक शेख नबी, मो.युसुफ यांच्यासोबत शेकडो आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# शासनाची फसवणूक करणारा आरटीओ बागडी पोलिसांच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

सुनियोजित कट रचून शासनाची आर्थिक फसवणूक केल्या प्रकरणातील मुख्य आरोपी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजकुमार आनंद वर्धकर (बागडी) यांना अखेर गाडगेनगर पोलिसांनी बुधवारी नागपूर येथून ताब्यात घेऊन दिवसभर त्यांची चौकशी केली.

प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील अधिकारी राजकुमार बागडी अमरावती येथे कार्यरत असताना ३० सप्टेंबर २०२२ रोजी ते सेवानिवृत्त होणार होते. परंतु त्यांनी कट रचून जन्मतारखेचे प्रमाणपत्र, टिसी, अधिवास प्रमाणपत्र अशी बनावट कागदपत्रे तयार करून दोन वर्ष अधिक सेवा उपभोगण्याकरिता त्या बनावट कागपत्रांचा वापर केला. तसेच १८ लाख १३ हजार ९५० रुपयांनी शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचा त्यांच्यावर ठपका होता.गृहविभागाने त्यांना सेवेतून कमी त्यांचा केल्यानंतर ते कार्यरत असल्याचे माहित पडताच सहायक परिवहन आयुक्तांनी संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. चौकशीदरम्यानबागडी दोषी आढळताच त्यांनी गाडगेनगर पोलिसांना चौकशी अहवाल सादर केला. त्या आधारावर गाडगेनगर पोलिसांनी २३ ऑगस्ट २०२४ रोजी मोटार वाहन निरीक्षक कैलास भरकाडे यांच्या तक्रारीवरून बागडी व त्यांना मदत करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणूक आणि कट रचल्याचा गुन्हा नोंदविला होता. मात्र बागडी पसार राहिल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. वर्धा, नागपूर आणि इतर ठिकाणी शोध घेतल्यानंतरही त्यांचा पत्ता लागत नव्हता.दरम्यान, अटकपूर्व जामिनासाठीही त्यांनीकोणताही अर्ज केला नव्हता. अखेर साडेसहा महिन्यांनंतर पोलिसांना त्यांचा पत्ता मिळाला. १८ मार्च रोजी नागपूरच्या नेहरूनगर भागात त्यांचे लोकेशन गाडगेनगर पोलीस मिळताच त्याच्या निवासस्थानी गेले आणि चौकशीसाठी हजर राहण्याची नोटीस बजावली.त्यानुसार बागडी बुधवारी सकाळी गाडगेनगर ठाण्यात हजर झाले. त्यानंतर पोलिसांनी दिवसभर त्यांची चौकशी केली बागडी यांनी चौकशीत सहकार्य नाही केले तर त्याला अटक करण्याची तयारी पोलिसांनी दर्शविली आहे.

# शाळांची वेळ दीड तासाने कमी करण्याचा आग्रह

## जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना शिक्षक संघटनांनी घातले साकडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

अमरावती आगामी २० मार्चपासून सुरु होणाऱ्या सकाळच्या सत्रातील शाळांची वेळ दीड तासाने घटविण्याच्या मागणीवर शिक्षक संघटना आक्रमक झाल्या आहेत. ही वेळ सव्वा १२ ऐवजी सकाळी ११ पर्यंतच ठेवावी आणि सकाळी सुरु करण्याची वेळ ७.१५ ऐवजी ७.३० करावी असे या संघटनांचे म्हणणे आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्यासह जिल्हा परिषदेच्या सीइओ व शिक्षणाधिकाऱ्यांना साकडे घालण्यात आले आहे.



उन्हाची वाढती दाहकता लक्षात घेता राज्यातील अनेक जिल्ह्यात दुपारी भरणाऱ्या शाळा बंद करण्यात आल्या असून सकाळच्या सत्रात वर्ग भरवले जात आहेत. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानेसुद्धा आगामी २० मार्चपासून सकाळच्या सत्रात शाळा भरवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सकाळी सव्वा ७ ते दुपारी सव्वा १२ अशी वेळ ठरविण्यात आली आहे. परंतु दुपारी सव्वा १२ म्हणजे भर दुपार होते, त्यामुळे त्यातील सव्वा तास कमी करण्यात यावा आणि सकाळी शाळा सुरु होण्याची वेळ १५ मिनीटांनी पुढे न्यावी, अशी शिक्षकांची मागणी आहे. बदललेल्या वेळापत्रकानुसार शिक्षणाधिकारी कार्यालयाने शाळांची वेळ सकाळी ७.१५ ते १२.१५ ही केली आहे. परंतु उन्हाची तीव्रता पाहता यात बदल होणे आवश्यक आहे. ही वेळ सकाळी ७.३० ते ११ अशी करावी, असा पर्यायही संघटनेने दिला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे तसेच उपशिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देतांना प्राथमिक शिक्षक समितीचे पुढारी गोकुलदास राऊत, सल्लागार संभाजी रेवाळे, जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार, जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे, राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर, राज्य महिला प्रतिनिधी प्रविणा कोल्हे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर, जिल्हा सचिव मनिष काळे, महीला आघाडीप्रमुख सरीता काठोळे, सरचिटणीस विनिता घुलक्षे, कोषाध्यक्ष भावना ठाकरे, सुनील डेहणकर, सचिन इंझाळकर, छगन चौधरी, गजानन कावलकर आदी उपस्थित होते.

# महाड क्रांती दिन चिरायू होवो! महाड क्रांती दिनी बडनेरा शहरात निघाला अभिवादन मार्च

## समता सैनिक दलाचे मार्शल, भारतीय बौद्ध महासभेचे हजारो कार्यकर्त्यांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०बडनेरा**

भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल बडनेरा-नांदगाव खंडेश्वर शाखा तर्फे संविधान समर्थक समाज जोडो अभियान अंतर्गत महाड क्रांती दिनाच्या निमित्ताने समता चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देवून भव्य अभिवादन मार्च काढण्यात आला. यावेळी महाड सत्याग्रह क्रांती दिन चिरावू होवो, तथागत गौतम बुद्ध की जय,डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय, छत्रपती शिवाजी महाराज की जय, समता सैनिक दलाचा विजय असो, भारतीय बौद्ध महासभेचा विजय असो, उपासक उपाशीका संघाचा विजय असो, भिख्खू संघाचा विजय असो, जय जय जय जय जय जय भीम, एकच साहेब बाबासाहेब या घोषणांनी संपूर्ण बडनेरा शहर दणाणून सोडले होते. महाड क्रांति दिनानिमित्ताने समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष प्रकाश बोरकर यांच्या नेतृत्वात बडनेरा शहरातून समता चौक येथील डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याला मानवंदना देऊन मार्चला सुरुवात झाली. समता चौक बडनेरा पोलीस स्टेशन बडनेरा बस स्थानक अशोक नगर कपिल वस्तू




मंडळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करून अभिवादन मार्च सुभाष चौक, आठवडी बाजार, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पोहोचला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर आठवडी बाजार जयस्तंभ चौक मार्गे सिद्धार्थ वाचनालय येथे अभिवादन मार्च समारोप करण्यात आला.अभिवादन मार्चमध्ये समता सैनिक दलाचे मार्शल, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी कार्यकर्ते बडनेरात शहरातील हजारो नागरिक सहभागी झाले होते.

**मानव मुक्तीचा लढा होता: प्रा.प्रकाश बोरकर**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९ ते २० मार्च १९२७ रोजी चवदार तळे येथे सामाजिक क्रांती केली. देशातील तमाम दलित, शोषित, पीडित आणि तळागाळातील घटकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा सार्वजनिक पाणवठ्यावर मिळावी याकरिता चवदार तळे येथे सत्याग्रह केला. हा केवळ पाण्यासाठी सत्याग्रह नव्हता तर मानव मुक्तीचा लढा होता. अशी प्रतिक्रिया जिल्हाध्यक्ष प्रा प्रकाश बोरकर यांनी प्रसिद्ध माध्यमांना दिली.

# नागपूर दंगलीचा मास्टरमाईंड फहीम खानवर देशद्रोहाचा गुन्हा, ५० दंगलखोरांवरही देशद्रोहाचा गुन्हा दाखल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०नागपूर

नागपुरातील दंगल प्रकरणात पोलिसांनी आक्रमक भूमिका घेतली असून या दंगलीचा मास्टरमाईंड फहीम खान याच्यासह ५० दंगलखोरांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बुधवारी सायबर पोलिसांनी केली सायबर क्राईम विभागाचे पोलीस उपायुक्त लोहित मतानी यांच्या मार्गदर्शनात फहीम खान व त्याच्या साथीदारांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागपुरातील दंगल भडकविणारा मास्टरमाईंडला फहीम खान याला पोलिसांनी अटक केली असून त्यानेच सर्वप्रथम मोठा जमाव गोळा करुन गणेशपेठ ठाण्यात विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांवर आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यासंदर्भात निवेदन दिले होते. पोलिसांनी ५१ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून आरोपींमध्ये मायनॉरिटी डेमोक्रॅटीक पार्टीचा अध्यक्ष फहीम खान शमीम खान याचा समावेश होता. या प्रकरणात सध्या २०० पेक्षा जास्त दंगलखोरांची नावे पोलिसांनी समोर आणली आहेत.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी महाल गांधीगेट परिसरात औरंगजेबाचे छायाचित्र आणि त्याच्या प्रतिकात्मक कबरीचे दहन केले होते. मात्र, त्यावर हिरव्या रंगाची चादर होती. ती चादरीवर 'आयत' लिहिलेली होती, असा आरोप होता. त्यामुळे मायनॉरिटी डेमोक्रॅटीक पार्टीचा अध्यक्ष फहीम खान शमीम खान याने काही युवकांना चादर जाळल्यामुळे धार्मिक भावना दुखावल्याचे सांगितले. त्यांची माती भडकवली त्यांना दंगल उसळवण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यानंतर फहीम खान याने स्वत: पुढाकार घेऊन तो गणेशपेठ पोलीस ठाण्यात पोहचला. त्याच्या पाठीमागे जवळपास ४० ते ५० युवकांचा जमाव होता.



### सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यावर गुन्हे दाखल

दंगल भडकवण्यासाठी कारणीभूत असलेल्या जवळपास तीनशेवर सोशल मीडिया अकाउंटची तपासणी केली. यामध्ये १७२ अकाउंट वर आक्षपार्ह पोस्ट आणि व्हिडिओ आढळून आले. या सर्वांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सध्या ४० टक्के व्हिडिओ आणि फोटो सायबर पोलिसांनी डिलीट केले आहेत. सोशल मीडियावर दंगली संदर्भात आक्षेपार्य मजकूर किंवा व्हिडिओ टाकणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**लोहित मतानी, पोलीस उपायुक्त,**
**नागपूर सायबर क्राईम.**

# शेतीसाठी स्प्रे पंपाला शंभर टक्के अनुदान; तुम्ही केला का? अर्ज

## कृषी विभागाची योजना : कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी योजना आहे लाभदायी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानासाठी अर्ज दाखल करायचे होते. त्यासाठी ऑनलाइन प्रस्ताव मागविण्यात आले होते. यासाठी ऑनलाइन प्रस्ताव कमी आल्याने ऑफलाइन स्वरूपात अर्ज मागविण्यात आले आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून जेवढे अर्ज येतील, त्यांना पंप वितरित होणार आहेत. ऑनलाइन अर्ज कमी दाखल झाले होते. यामुळे कृषी विभागाने ऑफलाइन स्वरूपातही अर्ज मागविले होते. यामुळे अर्ज दाखल करणाऱ्या प्रत्येकाला स्प्रे पंप मिळाला. कृषी विभागाने



कीड व्यवस्थापन आणि उत्पानवाढीसाठी शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर स्प्रे पंप देण्याचा निर्णय घेतला होता. यातून राज्यभरात महाडीबीटी पोर्टलवर अर्ज मागविण्यात आले. जिल्ह्यात ऑनलाइन अर्ज दाखल करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी आहे. यामुळे ऑफलाइन अर्ज मागविले होते.शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळविण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्यासाठी एकच गर्दी झाली आहे. अनेकांना ऑनलाइन स्वरूपात अर्जच दाखल करता आले नाहीत. ऑफलाइन अर्जामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

**पात्रतेसाठी निकष काय?**

एका सातबारावर एका शेतकऱ्याला एकच कृषी पंप दिला जातो. त्यासाठी शेतकऱ्याचा सातबारा, ८-अ, आधारकार्ड या बाबीची तपासणी केली जाते. पती आणि पत्नी दोघांच्या नावाने दोन सातबारा असतील, तर दोघांपैकी एकालाच स्प्रेपंप दिला जाणार आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर स्प्रे पंप देण्याचा निर्णय घेतला होता.

**लॉटरी पद्धतीने निवड**

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून आलेल्या अर्जाची लॉटरी काढली जाते. ऑनलाइन स्वरूपात लॉटरी पद्धतीने शेतकऱ्यांची निवड करून त्याच पद्धतीने ऑफलाइन स्वरूपाची निवड करून लाभार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे. सर्वत्र याच पद्धतीने लॉटरी काढून शेतकऱ्यांना लाभदिला जाणार आहे. मात्र जिल्ह्याला या योजनेतून वगळण्यात आले आहे.

**बॅटरी संचलित पंप**

बॅटरीवर चालणारा पंप आधुनिक स्वरूपाचा आणि गतिमान पंप आहे. यामुळे कमी वेळात अधिक शेतशिवारावर स्प्रे करता येतो. याच प्रमुख कारणामुळे शेतकऱ्यांनी बॅटरी संचाच्या पंपाच्या - खरेदीसाठी गर्दी केली आहे. कापूस व सोयाबीन उत्पादकांना स्प्रे करण्यासाठी पंप उपयोगाचा आहे.

## पाणीटंचाईसाठी हातपंप दुरुस्तीवर दिला जातोय भर : जिल्ह्यातील काही गावात पाणी टंचाई ला सुरुवात

विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती

पाणीटंचाईचे नियोजन करण्यासाठी तीन टप्प्यांमध्ये आराखडा तयार करण्यात येत असतो. जानेवारी-मार्च, एप्रिल-जून व ऑक्टोबर-डिसेंबर असे तीन टप्पे त्यात असतात. भूजल सर्वेक्षण विभागाकडून तयार करण्यात आलेल्या आराखड्यावर अभिप्राय घेतला जातो. विभागीय आयुक्तांच्या स्वाक्षरीने नंतर त्याला अंतिम स्वरूप दिले जाते. यात हातपंप दुरुस्तीची कामेही हाती घेण्यात आली आहेत.दरम्यान, पाणीटंचाई आराखडा मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला जात असतो. मंजुरीनंतरच प्रत्यक्षात कामांना सुरुवात होत



असते. जिल्ह्यातील प्रत्येक गावाच्या मागणीनुसार गावांना प्रस्ताव सादर करण्याची सूचना केली जात असते. त्यानुसार ग्रामपंचायत स्तरावर ठराव पारीत करून पाठविले जातात.जिल्ह्यात काही गावांमध्ये जलसंकट निर्माण होत असते. जिल्ह्यातील मेळघाट सह काही गावात टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. मार्च महिना अर्धा उलटला आहे. एप्रिल ते जूनपर्यंत गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे, हे येथे निश्चित.

**उपाययोजनांवर भर**

टँकर, तात्पुरत्या नळयोजना, विहिरी पाण्यासाठी अधिगृहित करणे, नवीन विंधन विहिरी, सरकारी विहिरीतून गाळ काढणे या उपाययोजनांचा टंचाई कृती आराखड्यात समावेश असतो.

# यवतमाळ मध्येहाय सिक्युरिटी नंबरप्लेटचा सावळा-गोंधळ

## वेंडरकडून जादा पैशांची मागणी : जीएसटी नसलेले शुल्क जाहीर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

वाहनधारकांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. 'वाहन फोर' या प्रणालीमध्ये वाहनाची ऑनलाइन नोंद नसेल, तर 'एचएसआरपी'साठी केलेला ऑनलाइन अर्ज स्वीकारत नाही. मुळात एचएसआरपी नंबर प्लेटच्या आडून शासनाला १५ वर्षे पूर्ण झालेली सर्वच वाहने निकाली काढायची आहेत. अथवा त्यांच्याकडून पर्यावरण कर वसूल करायचा आहे. यासाठी ही सक्तीची प्रक्रिया हाती घेतल्याचे आता उघड होऊ लागले आहे. एचएसआरपीसाठी ३० एप्रिल पर्यंतची मुदत शासनाकडून



देण्यात आली आहे. त्यानंतर थेट कारवाई केली जाणार आहे.

ऑनलाइन प्रक्रियेतून अर्ज केल्यानंतर एचएसआरपी नंबर प्लेट मिळविता येणार आहे. ही नंबर प्लेटकुठल्या लोकेशनवर हवी त्यासाठी स्वतंत्र वेंडर नियुक्त करण्यात आले आहेत. हे वेंडर मात्र शासनाने निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा अधिकचे पैसे मागत असल्याच्या तक्रारी आहेत. दुचाकीसाठी ४५० रुपये शुल्क असताना ७५० रुपयांची मागणी केली जात असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. शासनाने एचएसआरपीसाठी शुल्क निर्धारित करताना त्यात जीएसटी लावलेली नाही. १८ टक्के जीएसटी लावल्यानंतर किती शुल्क हे स्पष्ट नसल्याने त्याचाच आधार घेऊन नंबर प्लेट वेंडरकडून काही ठिकाणी अधिकच्या पैशाची मागणी केली जात आहे. सध्यातरी वाहनधानकांमध्ये एचएसआरपी प्रक्रियेवरून गोंधळाची स्थिती कायम आहे. त्यामुळे याला मुदतवाढ देण्यात यावी, अशीही मागणी आता होऊ लागली आहे.

### मुदतवाढ गरजेची

एचएसआरपी नंबर प्लेट नसणाऱ्या वाहनांची जिल्ह्यातील संख्या ही ५१ हजारांच्या पुढे आहे. या सर्व वाहनधारकांना ३० एप्रिलच्या आत एचएसआरपी नंबर प्लेट मिळणे शक्य नाही. या प्रक्रियेत अनेक अडथळे येत आहेत. काहींच्या वाहनांना १५ वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. त्यांना ग्रीन टॅक्स भरून वाहनाची वाहन फोर प्रणालीत नोंद करावी लागेल. नंतर एचएसआरपीसाठी अर्ज करता येईल. यासाठी मुदतवाढ गरजेची आहे.

### जीएसटीसह असे आहेत दर

शासनाने नंबर प्लेटसाठी दुचाकीला ४५० रुपये, तीन चाकी वाहना करता ५०० रुपये तर इतर सर्व वाहनांसाठी ७४५ रुपये शुल्क निर्धारित आहे. या रकमेवर १८ टक्के जीएसटी लावून होणारी रक्कम वाहनधारकांना मोजावी लागणार आहे. जीएसटीसह दुचाकीला ५३१ रुपये, तीन चाकीला ५९० रुपये आणि चारचाकी वाहनासाठी ८७२ रुपये शुल्क नियामानुसार आहे.

# माध्यमिकचे शिक्षक घेत आहे क्षमतावृध्दीचे धडे

## जि.प. माध्यमिक कन्या शाळा (गर्ल्स )हायस्कूल अमरावती येथे भातकुली तालुकास्तरीय प्रशिक्षनाचा ४ टप्पा सुरुवात



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी संपूर्ण देशभरात विविध टप्यावर करण्यात येत आहे. त्याअंतर्गत महाराष्ट्रामध्ये हे धोरण पूर्णपणे लागू करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ५ दिवसीय तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण १० ते १४ फेब्रुवारी २०२५ला पहीला टप्पा,१७ते२१फेब्रुवारी दुसरा टप्पा आणि तिसरा टप्पा २४ते२८फेब्रुवारी २०२५ व चौथा टप्पा १८ते २२ मार्च दरम्यान जि.प.माध्यमिक कन्या शाळा कॅम्प अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे.

तालुकास्तरीय प्रशिक्षणात ८ तज्ज्ञ मार्गदर्शक तालुक्यातील ९० माध्यमिक प्रशिक्षणार्थिना सध्या प्रशिक्षण देत आहे. यात जिल्हा परिषदेचे व खासगी माध्यमिक शिक्षकांचा समावेश आहे. जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी हे तालुकास्तरावर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्य करीत आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्वाचे बदल पोहोचविण्याचे काम केले जाणार आहे. या प्रशिक्षणात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा, क्षमता आधारित मूल्यांकन आराखडा, क्षमता आधारित मूल्यांकन कार्यनिती, क्षमता आधारित प्रश्न निर्मिती कौशल्ये, विचार प्रवर्तक प्रश्न, समग्र प्रगतीपत्रक इत्यादी विषयावर हे प्रशिक्षण दिले जात आहे.गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे यांच्या मार्गदर्शनात चंद्रकांत कडवे हे या प्रशिक्षणाची समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. तालुकास्तरीय प्रशिक्षणात,पंकज हिरोडे,श्वेता पांडे,निलेश चाफलेकर,सुनिल ढोणे,संजय गेडाम,राजेन्द्र ठाकरे,भावना खांडे,संदिप भटकर,हे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावत आहे. तर, गटासाधन केंद्राचे चंद्रकान्त कडवे सहकार्य करीत आहे.

**तालुक्यातील सर्वच शिक्षकांना प्रशिक्षण मिळणार**

तालुक्यात चार टप्प्यात हे पाच दिवसीय प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणात इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्वच शिक्षकांचा सहभाग राहणार आहे. तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक विभागातील ३३६ शिक्षकांना तिन टप्प्यात तालुका स्तरावर हे प्रशिक्षण दिले आहे.आता शेवटचा चौथा टप्पा ९० माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात असल्याचे गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे यांनी सांगितले.

# निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी संजय खोडके यांना आमदारकीचे प्रमाणपत्र केले बहाल

## अमरावती मधील सर्व सहकाऱ्यांनी आ.संजय खोडके यांचे मुंबई येथे केले स्वागत व अभिनंदन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०मुंबई

येत्या २७ मार्च रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेवरील पाच जागांच्या पोटनिवडणुकीकरिता ६ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. आज गुरुवार दिनांक २० मार्च रोजी नामांकन अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी एक नामांकन मागे घेण्यात आल्याने विधान परिषदेच्या पाचही उमेदवारांची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने विदर्भातील नेते संजय खोडके यांची विधानपरिषदेवर बिनविरोध निवड करून सदस्य म्हणून प्रमाणपत्र बहाल करण्यात आले. शेतकरी पुत्र ते कृषी खात्यात नोकरी व नंतर विधीमंडळ -मंत्रालय पर्यंतचा प्रवास आता आमदार झाल्या बद्दल श्री.संजय सुशीलाबाई विनायकराव खोडके यांच्या रूपाने अमरावतीला राज्य विधिमंडळात आणखीन एक प्रतिनिधित्व मिळाले असल्याने अमरावतीमधील सर्व सहकारी व कार्यकर्त्यांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.



भारतीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांकरिता पोट निवडणूक घेण्याकरीता १० मार्च २०२५ रोजी अधिसूचना जाहीर करीत येत्या २७ मार्च २०२५ रोजी निवडणूक घेण्याची घोषणा केली. या दरम्यान गेल्या १७ मार्च रोजी नामांकन अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असल्याने पाच जागांसाठी सहा जणांचे नामांकन अर्ज दाखल करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून एका जागेकरिता संजय खोडके यांच्या नावाची एकमताने निवड करण्यात आल्या नंतर त्यांनी पक्षाच्या जेष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत गेल्या १७ मार्च रोजी आपला नामांकन अर्ज दाखल केला.

अशातच आज गुरुवारी नामांकन अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी एक अर्ज मागे घेण्यात आल्याने विधान परिषदेच्या पाचही जागा बिनविरोध निवडल्या गेल्यात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विदर्भातील नेते संजय खोडके यांची विधानपरिषदेवर बिनविरोध वर्णी लागली असून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी संजय खोडके यांना सदस्यत्वाचे प्रमाणपत्र प्रदान केले आहे. यावेळी आमदार सौ. सुलभाताई खोडके , यश खोडके आदी उपस्थित होते. संजय खोडके आमदार बनल्याचा राष्ट्रवादी पक्षात तसेच अमरावतीमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.सांगण्यात येते की, संजय खोडके हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विदर्भातील प्रमुख नेते म्हणून ओळखले जातात. संजय खोडके हे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे अत्यंत निकटवर्ती व विश्वासू असून विधिमंडळ व मंत्रालयीन कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव, संघटन कौशल्य, नेतृत्व क्षमता, व्यवस्थापन, सर्व पक्षांमध्ये जनसंपर्क व समन्वय,अशा विविधांगी व्यक्तिमत्व म्हणून संजय खोडके यांची ओळख व लौकिक आहे. मागील ३५ वर्षांपासून ते राजकारणात सक्रिय असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसोबत असलेली बांधिलकी व प्रदीर्घ योगदान लक्षात घेता संजय खोडके यांची राष्ट्रवादी कडून विधान परिषदेवरील एक जागेसाठी एकमताने निवड करून त्यांना बिनविरोध विधान परिषदेवर पाठविण्यात आले आहे.

# रमजानमुळे टरबूज, खरबुजाची आवक वाढली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

उन्हाळ्याला सुरुवात झाली असून सर्वाधिक थंडगार व गोड फळ म्हणून टरबूज व खरबुजाला ओळखले जाते. उन्हाळा व रमजान महिना सुरू झाला आहे. मुस्लीम बांधव जास्त प्रमाणात सायंकाळी हीच फळे खाऊन आपला उपवास सोडतात. त्यामुळे या फळाची सध्या मोठ्या प्रमाणावर मागणी वाढली आहे. ग्रामीण भागातून दररोज बाजारात दोन ते तीन मेटॅडोरमध्ये टरबूज व खरबूज भरून विक्रीसाठी सध्या येऊ लागले आहे.



रमजान महिन्यामुळे शेतकऱ्यांच्या या फळांना बऱ्यापैकी भावदेखील मिळत असल्याचे व्यापारी सांगतात.अनेक शेतकऱ्यांनी टरबूज व खरबूज या फळांची लागवड केलेली आहे. या फळांना कडाक्याच्या उन्हाळ्यात मोठी मागणी राहते. त्यातच सध्या मुस्लीम बांधवांचा रमजान महिनादेखील सुरू झाला आहे. जवळपास सर्वच बांधव दिवसभर उपवास धरून सायंकाळी टरबूज व खरबूज खाऊनच आपला उपवास सोडतात. उन्हाळा सुरू झाल्याने सर्वजण ही फळे खरेदी करू लागले आहेत. मागणी चांगलीच वाढल्याने तालुक्यातील बाजारात ही फळे विक्रीसाठी सध्या अधिक येऊ लागली आहेत.

**गत महिन्याच्या तुलनेत मिळतोय भाव चांगला**

गत महिन्यात टरबूज व खरबूज कवडीमोल दराने शेतकऱ्यांना विकावे लागले. मात्र, सध्या रमजान महिना व उन्हाळा एकाच वेळी आल्याने या फळांच्या मागणीत दररोज वाढ होऊ लागली आहे.

दररोज विविध वाहनांतून ही फळे विक्रीसाठी सकाळपासूनच शेतकरी येत आहे. गत महिन्याच्या तुलनेत या महिन्याच्या सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या या फळांना बऱ्यापैकी भाव मिळू लागला आहे, असे घाऊक फळविक्रेते एजाज यांनी सांगितले.